RNI NO.MAHMUL/2013/53138 POSTAL Reg. No.THC/85/2023-2025 Post at Thane Head Post Office- 400601, Published on 1st of every month and posted on 5th of every month



वर्ष बारावे | अंक ४ | सप्टेंबर २०२४ | पृष्ठे ५२

अहम् आवाम्

# वयम्

आपणासाठी

कल्पक, चौकस
किशोरांचे मासिक

मूल्य
₹१०/-



# एक स्मार्ट सायकल

## इलेक्ट्रिक बायसिकल

## विदु



सायकलने लांबवर प्रवास करताना पॅडल मारून पाय थकले की मनात येते, आता ही आपोआप चालली तर! अशा वेळी 'इलेक्ट्रिक बायसिकल' हा पर्याय सोयीचा! पॅडल मारून पाय भरून आले की, एक कळ दाबायची आणि मोटार सुरू करायची की, झाली ऑटोमॅटिक सायकल! त्यासाठी 'लॅबइंडिया' कंपनीने सोयीची अशी 'इलेक्ट्रिक बायसिकल' विकसित केली आहे. लॅबइंडिया कंपनीने तयार केलेली 'विदु' आता वितरणासाठी सज्ज झाली आहे.

MAKE IN INDIA

'विदु'चे प्रत्यक्ष वितरण आता सुरू झाले आहे. इच्छुकांनी त्यांचे नाव, पत्ता, संपर्क क्रमांक अनंथ पिल्लाई- (**Whatsapp** : 9167033497, **Email** : Ananth.Pillai@labindia.com) यांना कळवावा, म्हणजे त्यांना प्राधान्य देण्यात येईल.

LABINDIA®

**Labindia Equipments Pvt. Ltd.**

201, Nand Chambers, L. B. S. Marg, Near Vandana Cinema,
Thane - 400 602, India.

**Contact :+91-022-25986160 , +91-022-69086160**


मिनू
अदिती पाध्ये-देसाई
aditeepd@gmail.com
दिवस १
आई, मला शाळेतल्या एका कार्यक्रमासाठी समूहगीताची तयारी करायची आहे. मी आता त्याचा रियाज करायला बसते आहे. थोडा वेळ मला हाक मारू नकोस हं.
रियाज !
माणुसकीच्या शत्रू संगे युद्ध आमुचे सुरू . . .
दिवस ४
जिंकू किव्वा मरू . .
जिंकू किव्वा मरू
दिवस ७
लढती सैनिक, लढू नागरिक..
दिवस १०
आहे कधी ग तो कार्यक्रम ?
देश आमुचा शिव रायाचा..
पुढच्या आठवड्यात..
अरे ! मामा, तू कधी आलास ? मला कळलंच नाही. माझ्या गाण्याचा रियाज सुरू होता ना.. थांब हं, तुला माझं गाणं म्हणून दाखवते.
नको

RNI NO.MAHMUL/2013/53138
अहम् आवाम्
कल्पक, चौकस किशोरांचे मासिक
# वयम्
आपण सारे
वर्ष १२ | अंक ३ | ऑगस्ट २०२४
आषाढ / श्रावण शके १९४६

**प्रकाशक**
श्रीकांत बापट

**सल्लागार**
डॉ. अनिल काकोडकर
कुमार केतकर
डॉ. आनंद नाडकर्णी
डॉ. उदय निरगुडकर
राजीव तांबे

**मुख्य संपादक**
शुभदा चौकर
(पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी)

**मुखपृष्ठ**
अच्युत पालव

**सुलेखन**
अच्युत पालव

**अंकातील चित्रे**
अदिती पाध्ये-देसाई, जुईली माहीमकर, वैष्णवी माहीमकर, ऋचा दामले

**वरिष्ठ उपसंपादक**
क्रांती गोडबोले-पाटील

**मांडणी-सजावट**
क्रांती गोडबोले-पाटील

**मुद्रितशोधन**
शिवानी ओक

**वितरण व्यवस्था**
राजेंद्र गोसावी

'वयम्' हे मासिक मालक, प्रकाशक श्रीकांत बापट यांनी मेसर्स रेड एलिफंट, ३१५/ए १, शाह ॲण्ड नाहर इंड. इस्टेट, ३रा मजला, एस. जे. मार्ग, लोअर परेल (प.) मुंबई- ४०००१३, येथे छापून, २०१, नंद चेंबर्स, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२ येथे प्रसिद्ध केले. या अंकातील सर्व मतांशी संपादक सहमत आहेत असे नाही. सर्व हक्क प्रकाशकाधीन.

**संपादकीय विभाग :**
'वयम्', न्यू वंदना को.ऑप.हा.सो., ३रा मजला, लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमाजवळ, ठाणे- ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५९८६२७३/ ६९०८६२७३
इमेल : info@wayam.in

www.wayam.in

# अंतरंग



शिक्षक दिनाच्या सर्व शिक्षक मंडळींना 'वयम्' मासिकातर्फे खूप खूप शुभेच्छा!


- संपादकीय : शुभदा चौकर- ४
- पर्यावरणप्रधान गणपती : क्रांती गोडबोले-पाटील- ६
- कल्पककला : स्वरूपा वक्नाली- ९
- खाद्यसफर- (गणेशोत्सव) : डॉ. मंजूषा देशपांडे- १०
- जग-मित्र 'गूगल' : भक्ती बिसुरे- १४
- अन्नसाखळी : प्रा. सुहास बारटक्के- १७
- छकुलीचा 'मॅडनेस' : माधव गवाणकर- १८
- Bappa's Motley Treat : Prachi Mokashi- २०
- संकेत भाषा- आपली आद्य भाषा : शुभदा चौकर- २४
- Hide & Seek : Mahimkar Sisters- २६
- वैतरणेतील शिडाची गलबतं : वंसत वसंत लिमये- २८
- Witty Talks : Prachi Mokashi- ३३
- कावळ्यांच्या एकीचं बळ : डॉ. सुरेश सावंत- ३४
- 'ण' चे गाणे : डॉ. नीलिमा गुंडी- ३७
- मनोविकास : वैदेही भिडे- ३८
- लोककथा- अजब भूत : कांचन जोशी- ४०
- LIGO-India : Shivani Pethe-Kane- ४२
- पकोडे- टवीटि : राजीव तांबे- ४६
- ढगॉलॉजी : कृपा कुलकर्णी- ४८
- मिनू : अदिती पाध्ये-देसाई- ५१


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

'वयम्' वाचकांनो, दर महिन्याला २० तारखेपर्यंत तुम्हांला अंक पोहोचला नाही तर 'वयम्'च्या दूरध्वनी क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ या वेळात संपर्क साधावा, ही विनंती. -**संपादकीय आणि वितरण विभाग**



# संपादकीय

# खिलाडूवृत्तीचा उत्सव!

**'वयम्' दोस्तांनो,**

ऑलिम्पिकच्या स्पर्धा पाहिल्यात का? मला जाम आवडतात वेगवेगळ्या खेळांचे सामने स्क्रीनवर बघायला. खेळाडूंची तयारी, जिद्द आणि तन्मयता जाणवते त्यांच्या देहबोलीतून.

'देखणे ते चेहरे, जे प्रांजळाचे आरसे, गोरटे की सावळे, या मोल नाही फारसे' अशी खरे देखणेपण सांगणारी कविता आहे बा. भ. बोरकर यांची. त्या ओळी आठवतात अशा वेळी. जिगरीने खेळणारे खेळाडू फार छान दिसतात. वेगवेगळ्या स्टाइलने पोहोण्याच्या स्पर्धा, आर्टिस्टिक स्वीमिंग, रिदमिक जिम्नॅस्टिक हे खेळ म्हणजे तर खेळातील कलाकृतीच!

जगभरातून इतके ग्रेट खेळाडू एकत्र येतात, तेव्हा त्यातल्या अनेकांच्या प्रेरणादायी गोष्टी कळतात. आफ्रिकन-अमेरिकन जिम्नॅस्ट सिमोन बाईल्स ही वर्णभेदाच्या अनुभवाने आलेल्या दुखावलेपणातून आणि नैराश्याच्या गर्तेतून स्वतःला बाहेर काढून पॅरिस ऑलिम्पिकमध्ये सहभागी झाली आणि पाच पदके मिळवून सर्वांच्या कौतुकाचा विषय बनली.

आपली विनेश फोगट स्पर्धेच्या बाहेर का, कशी पडली याची करुण कथा तुम्हांला माहितीच आहे. या निमित्ताने काटेकोर नियम कसे पाळावे लागतात आणि थोडीशी हयगयसुद्धा सुवर्णसंधी गमवायला कशी कारणीभूत होते, हे आपल्याला पाहायला मिळाले. एरव्ही अनेक गोष्टीत आपण 'चलता है' मनोवृत्ती बाळगून स्वतःला सवलत देत असतो. या घटना आपल्याला काटेकोरपणाचे गांभीर्य जाणवून देतात. हा लेख लिहिताना मी नेदरलँड देशात आहे. इथे मी अनेकदा अनेकांच्या अंगात भिनलेली सामाजिक शिस्त बघतेय. इथे मोटारगाड्या, सायकल आणि पायी चालणारे या तिघांसाठी स्वतंत्र लेन आहेत. शक्यतो कोणी कोणाच्या मध्यात येत नाही. या लेनमध्ये गर्दी आहे, तर आपण दुसऱ्याच्या लेनमधून भराभर पुढे जाऊ, असा आगाऊपणा कोणी करत नाही. चालणारे, सायकलस्वार किंवा मोटार ड्रायव्हर कोणीही सिग्नल मिळाल्याशिवाय रस्ता अजिबात क्रॉस करत नाहीत, अगदी रिकामा रस्ता असला तरी सिग्नल मिळेपर्यंत थांबतात. सार्वजनिक नियम आणि शासनाने ठरवून दिलेल्या सिस्टीम्स बहुतांश लोक आदराने पाळताना दिसतात. आपण मात्र 'नागरिकशास्त्र' हा विषय पुस्तकात शिकलो तरी कठोरपणे अमलात आणतो असे नाही.

ऑलिम्पिक खेळाडूंची खिलाडूवृत्ती पाहून अचंबित व्हायला होते. आपला भालाफेकपटू नीरज चोप्रा याला यंदा सिल्व्हर मेडलवर समाधान मानावे लागले आणि त्याचा पाकिस्तानी स्पर्धक अर्शद नदीमने उत्तम खेळून सुवर्णपदक मिळवले. नीरजने आणि त्याच्या आईने अत्यंत खेळकरपणे हा निकाल







स्वीकारत अर्शद नदीमचे अभिनंदन केले. भारत आणि पाकिस्तान या देशांत शत्रुत्व असले तरी खेळाडू खेळताना तेवढे प्रतिस्पर्धी आणि एरव्ही मित्र म्हणून कसे नाते जोडतात, याचा हा दाखला. या दोघांच्या नात्याला एक पार्श्वभूमी आहे. २०२१मध्ये टोक्यो ऑलिम्पिकमध्ये नीरज चोप्रा सुवर्णपदक विजेता होता. तेव्हा नीरजसोबत अर्शद नदीमही अंतिम फेरीत पोहोचला होता. पहिला भाला फेकण्यापूर्वी नीरजचा भाला अर्शदच्या हातात दिसला. नीरजने त्याच्याकडून भाला मागून घेतला आणि फेकला. अर्शदने हे मुद्दाम तर केले नाही, असे म्हणत या प्रसंगाला भारत-पाक दुराव्याचा रंग देण्याचा प्रयत्न काहींनी सोशल मीडियावरून केला होता. पण नीरज चोप्राने अशा भलत्या आरोपांना वेळीच लगाम लावला. नीरज ठामपणे म्हणाला होता, "ही फार मोठी गोष्ट नाही. आम्ही सर्व खेळाडू आमचे भाले एका ठिकाणी ठेवतो, आपापली वेळ आली की उचलतो. अर्शदने काही जाणूनबुजून माझा भाला घेतला नव्हता. सर्वांना विनंती आहे की, खेळाला भलते रंग-बेरंग देऊ नका. खेळ आपल्या मानवजातीला एकत्र आणण्यासाठी असतात..."

यंदा दक्षिण कोरिया आणि उत्तर कोरियाच्या टेबल टेनिसपटूंनीही पदक स्वीकारताना, एकमेकांसोबत सेल्फी काढत मानवी मैत्रीच्या नात्याचे दर्शन घडवले.

या घटना 'ग्लोबल व्हिलेज'मध्ये राहणाऱ्या तरुणाईचे प्रतिनिधित्व करतात. इतिहासातील कटू घटनांचे ओझे न बाळगता माणसांशी उमदेपणाने वागणारी तरुणाई आहे तुमची. आम्हांला या जगात कोणत्याही प्रकारचे भेदभाव नको आहेत, हे अनेक खेळाडूंनी ऑलिम्पिक स्पर्धेतही वेगवेगळ्या प्रकारे व्यक्त केले.

संत ज्ञानेश्वर यांनी तेराव्या शतकात पसायदानातून 'पूर्ण विश्वाचे भले होवो, दुर्जनांचा दुष्टपणा गळून पडो, वाईट प्रवृत्तीच्या लोकांचा कटूपणा दूर होऊन त्यांना चांगलं वागण्याची बुद्धी होवो', अशी प्रार्थना केली. तीच भावना आज एकविसाव्या शतकात अनेक खेळाडू मांडत आहेत.

ऑलिम्पिक आणि दिव्यांगांसाठी असलेल्या पॅराऑलिम्पिकचे बोधवाक्य होते- Games Wide Open. त्याचा अर्थ त्यांनी उलगडून सांगितला होता की, खेळाच्या द्वारे सगळे बंद दरवाजे उघडा! सर्व भेदांच्या भिंती दूर करा. अपंगत्व खेळाच्या आड येऊ देऊ नका. आपल्यासमोर असलेल्या प्रत्येक आव्हानाकडे डोळसपणे बघा. खेळ आणि खिलाडूवृतीतून कोंडलेल्या भावना मोकळ्या होऊ शकतात! खेळाची ही ताकद आजमावण्यासाठी जगभरातील खेळाडू, खेळ-प्रेमी सर्वांनी एकत्र यावे, यासाठी असते ऑलिम्पिक, नेमाने चार वर्षांनी.

म्हणूनच हा उत्सव बघायला मजा येते. यांतील अनेक खेळाडू आपल्या ओळखीचे नसतात, त्यामुळे कोण जिंकले कोण हरले, याने आपल्याला फरक पडणार नसतो. पण त्यांचा खेळ, उमदेपणा आणि खिलाडूवृती बघितली की, जगाचे एक सुखद चित्र समोर उभे राहते.

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*

# पर्यावरण प्रधान रूप गणेशाचे



पर्यावरणस्नेही गणपती साकारणारे हे दोन नवे प्रयोग... बाप्पाचं हे रूप मनाला जास्त मोहक वाटलं.

**ओंकारप्रधान** रूप गणेशाचे... कोणत्याही रूपातला बाप्पा असो, त्याचं रूप मोहकच असतं. अलीकडे मूर्ती साकारताना अनेक जण पर्यावरणपूरक गणपती साकारत आहेत. मध्यंतरी एका प्रदर्शनात कोकोपीटपासून बनवलेल्या गणपतीच्या मूर्ती पाहिल्या. ही नवीन कल्पना ज्यांना सुचली, त्या एकनाथ राणे यांच्याशी गप्पा मारल्या. शिवाय पेपरपासून गणपती साकारणारे पराग पारधी यांच्या गणपती-शाळेला भेट दिली.

## कोकोपीट गणेश

'गार्गी गणेश' या नावाने एकनाथ राणे 'कोकोपीट'पासून गणपती तयार करतात. एकनाथ राणे मूळचे मालवणचे. मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून त्यांनी १९९४ साली 'अप्लाइड आर्ट'ची डिग्री घेतली. त्यानंतर त्यांनी ॲड एजन्सी आणि फिल्म इंडस्ट्रीमध्ये काम केलं. करोना काळात काही काम नसल्यामुळे ते थोडे धास्तावले. गावाला जाऊन नवीन काहीतरी करता येतं का ते बघू, असा विचार करून ते मालवणला गेले. तिकडे त्यांनी कोकोपीटवर प्रयोग करायला सुरुवात केली. सुरुवातीला कोकोपीटसाठी लागणारी मशिनरी त्यांना नीट मिळाली नाही. मात्र हळूहळू तो भुसा एकत्र बांधून आकारात वळवायला (बाइंडिंग) त्यांना जमू लागलं.

आपण नारळपाणी पिताना जी हिरवी साल आपल्याला दिसते, ती साल सुकल्यावर हलकी होते. मालवणी भाषेत या सालीला 'सोडणं' म्हणतात. चुलीमध्ये जाळसामान म्हणून या नारळाच्या सुकलेल्या सालीचा उपयोग करतात. या सुकलेल्या साली दळून कोकोपीट तयार करतात. हे कोकोपीट थोडं खरखरीत राखेसारखं किंवा भुशासारखं असतं.

कोकणात नारळ भरपूर. विकतचं कोकोपीट महाग पडतं. त्यापेक्षा ते तयार करणं कमी खर्चाचं होतं. हे सगळे प्रयोग सुरू असतानाच राणेकाकांनी सिंधुदुर्गमध्ये माळगावकरसरांच्या गणपती बनवण्याच्या कार्यशाळेत सहभाग घेतला. त्यात

ते 'गोमय' गणपती बनवायला शिकले. म्हणजे गायीच्या शेणापासून होणारी मूर्ती. गोमय गणपती बनवताना त्यात कोकोपीट मिक्स करून त्यांनी गणपती बनवून पाहिला. तिथून त्यांना सुचलं की, कोकोपीटपासूनही मूर्ती करता येईल.

राणेकाकांनी कोकोपीटमध्ये थोडी शाडू माती चाळून घेऊन मिसळली. हा प्रयोग यशस्वी झाला. मूर्तीवर फिनिशिंग व्यवस्थित करता येऊ लागलं. गावातील अनेक महिलांना त्यांनी आपल्या या कामात सहभागी करून रोजगार दिला आहे. हळद-कुंकू, गेरू, मुलतानी माती यांचा वापर करून ते गणपती रंगवतात. फक्त बॉर्डर किंवा बारीक रेखाटन करण्यासाठी पोस्टर कलरचा वापर केला जातो.

साधारण ९ इंचापासून ते २८ इंचापर्यंतच्या मूर्ती ते बनवतात. या मूर्ती वजनानेही हलक्या असतात. वर्षभर ते मूर्तिकाम करत असतात. कोकोपीटपासून एक मूर्ती तयार करायला पाच दिवस लागतात.

कोकोपीटच्या मूर्तीचं विसर्जन घरच्याघरी बादलीत सहज करता येतं. मग त्या कोकोपीटयुक्त मातीत झाड लावता येतं. गेली दोन वर्षं राणेकाका त्यांच्या घरात याच गणपती-मूर्तीचं पूजन करत आहेत.

तुम्हांलाही पुढच्या वर्षीसाठी कोकोपीटच्या मूर्ती हव्या असतील तर एकनाथ राणे यांच्याशी संपर्क साधू शकता. संपर्क क्रमांक- 9820039328.

## पेपर गणपती

आम्ही 'पेपर कला क्रिएशन' लोअर परेल इथे गेलो होतो. तिथल्या मूर्तींचं फिनिशिंग, रंगकाम, सुबकता पाहिल्यावर ती कागदाच्या लगद्याची मूर्ती वाटलीच नाही. फारच आकर्षक!

पराग पारधी हे ते कलाकार. त्यांनी तीन वर्षांपूर्वी पेपर गणपती बनवायला सुरुवात केली. परागदादा कॉमर्स ग्रॅज्युएट आहे. त्याने फायनान्समध्ये एमबीए केलंय. काही काळ नोकरी केल्यावर त्याला स्वतःचं काहीतरी सुरू करायचं होतं. कलाकुसरीची, गणपती बनवण्याची आवड असल्याने त्याने गणपती-शाळा सुरू करायची ठरवली.

लहानपणापासून तो त्याच्या नातेवाइकांबरोबर मूर्ती बनवत होता. एका चॅनेलवर त्याने पेपरपासून तयार होणाऱ्या मूर्तींचा व्हिडिओ पाहिला. मग त्याने त्या कलेचा मनापासून अभ्यास स्वतः केला. खूप सरावानंतर पेपरपासून सुबक मूर्ती साकारू लागली. यातूनच 'पेपर कला क्रिएशन' या गणपती





*कोकोपीट गणेश*




*पेपर गणपती*

शाळेला सुरुवात झाली.

परागदादा पेपर इंडस्ट्रीमधून, रद्दीमार्टमधून कागद घेतो. इंडस्ट्रीमध्ये नको असलेला माल, शालेय मुलांच्या संपलेल्या वह्या अशी रद्दी वापरून मूर्ती घडवतो.

कागद एक-दोन तास पाण्यात भिजत ठेवावा लागतो. त्यानंतर त्यात डिंक मिसळून त्यामध्ये व्हायटिंग पावडरही मिसळली जाते. त्यामुळे लगदा चिकण मातीसारखा बनतो. तो साच्यामध्ये लेपून त्यापासून पेपर-मूर्ती बनवल्या जातात.

शाडू माती किंवा पीओपीच्या मूर्ती साच्यामध्ये घातल्या की लगेच बाहेर काढल्या जातात, पण पेपरच्या मूर्तींचं तसं होत नाही. ती सुकण्यासाठी दोन-तीन दिवस मूर्तीला साच्याच्या आतमध्ये ठेवावं लागतं. फक्त या मूर्तींना पाण्यापासून थोडं जपावं लागतं.

साधारणतः एक मूर्ती घडवायला बराच वेळ लागतो. वर्षभर हे काम सुरू असतं. उन्हाळ्यात तो आणि त्याची टीम मिळून मूर्ती बनवून ठेवतात, म्हणजे मूर्ती पटपट सुकतात. साधारणतः एक फुटापासून ते दहा फुटांपर्यंतच्या मूर्ती 'पेपर कला क्रिएशन'मध्ये बनवल्या जातात.

पाण्यामध्ये तीन ते चार तासांमध्ये या मूर्तीचं विसर्जन होतं. हे विसर्जन केलेलं पाणी झाडांच्या मुळात आपण वापरू शकतो.

स्वतः साकारलेला गणपती परागदादा घरी बसवतो तेव्हा त्याची एक्साइटमेंट डबल होऊन जाते. तो म्हणाला, "माझ्या घरातले, मित्रमंडळी, ऑफिस सहकारी जेव्हा घरी येऊन माझ्या गणपतीच्या मूर्तीचं कौतुक करतात, तेव्हा ती माझ्यासाठी प्राऊड मोमेंट असते."

दादर चौपाटीवर गणपतीचे विसर्जन झाल्यानंतर परागदादाने अनेक मूर्ती समुद्राजवळ अशाच पडलेल्या पाहिल्या आणि त्याचा त्याला त्रास झाला. त्यातूनच मग त्याने पर्यावरणपूरक गणपती मूर्ती बनवणं सुरू केलं. त्याच्या मते सर्वांनी घरात पर्यावरणपूरक मूर्तीचीच पूजा करावी.

परागदादाकडे आम्ही गेलो तेव्हा तिथले सगळे मूर्तिकामात तल्लीन झाले होते. ते वातावरण खूपच प्रसन्न करणारं होतं. वजनाने अत्यंत हलक्या आणि उचलायला सोप्या असणाऱ्या मूर्ती लोकांना अत्यंत आवडत असल्याने या मूर्तींना खूप मागणी आहे. दिसायला मनमोहक असलेली पर्यावरणपूरक मूर्ती तुम्हांला पुढच्या वर्षीसाठी हवी असेल तर संपर्क क्रमांक- 8879896969

**राणेकाका आणि परागदादा यांच्याशी मारलेल्या रंजक गप्पा पाहण्यासाठी 'वयम्' मासिकाच्या यू ट्यूब चॅनलला नक्की भेट द्या.**

या दोघांशी गप्पा मारल्यावर पर्यावरणपूरक गणपतीबाप्पाचं काळानुसार बदलणारं हे रूप अधिक मोहक वाटलं.

-शब्दांकन **-क्रांती गोडबोले-पाटील**
*krantigodbole530@gmail.com*

# कल्पकला

## गोंड्यांनी सजवलेला दिवा

**साहित्य–** जुन्या CD किंवा कार्डबोर्ड (गोल आकारात कापलेला), रंगीत लोकर किंवा रंगीत जाडसर धागा, रंगीबेरंगी गोंडे, आरसे, मणी/मोती, मेणबत्ती (Tea light), मेणबत्ती ठेवायला पणती किंवा candle holder.

**कृती–** जुन्या सीडीच्या कडेने रंगीत लोकर किंवा रंगीत जाडसर धागा चिकटव. आता सीडीच्या मध्यभागी पणती किंवा candle holder चिकटव. सीडीच्या कडेने लावलेल्या लोकरीवर रंगीबेरंगी गोंडे आणि त्यावर छोटे छोटे आरसे चिकटव. त्यानंतर गोंड्यांच्या अवतीभवती मणी/ मोती चिकटवून तो दिवा सजव. अशाप्रकारे सणावारासाठी किंवा शो पीस म्हणून गोंड्यांनी सजवलेला दिवा तयार!

**–स्वरूपा वक्नाली**
*swarupamv@gmail.com*








गण म्हणजे समुदाय. सर्वांनी मिळून साजऱ्या केल्या जाणाऱ्या गणपती उत्सवाच्या काळात पत्री, रानफुले गोळा केली जातात. तुंदिलतनु गणपतीच्या नैवेद्यासाठी वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळे खाद्यपदार्थ केले जातात. निसर्गातल्या आणि आपल्या खाद्य-संस्कृतीतल्या वेगळेपणाची झलक अनुभवायला मिळते.

# ‘तुंदिलतनु’च्या उत्सवाला चंगळ!

**गणेश** चतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिका असते. महाराष्ट्रात खेडोपाडी काही ठिकाणी मुली वाळूचा महादेव आणि पार्वती तयार करून त्यांची पूजा करतात आणि दिवसभर उपास करतात. या पूजेसाठी अनेक प्रकारची पाने गोळा करावी लागतात.  त्या निमित्ताने वेगवेगळ्या वनस्पती आणि त्यांच्या औषधी उपयोगांची माहिती होते.

विदर्भात गोकर्ण, जाई, गणेश, गौरी, दाशाळे यांसारख्या वेगवेगळ्या रंगांच्या म्हणजे पावसाळी रानफुलांनी ‘भराडी गौर’











सजवतात. त्यासाठी एका परडीवर फुलांची रांगोळी काढतात. त्यावर पळसाची पाने ठेवून ती रांगोळी उलटी करतात. ती रांगोळी खूपच सुंदर दिसते. गावातील एखाद्या देवळात त्या रांगोळ्यांचे प्रदर्शन भरवले जाते. भराडी गौर सजवणाऱ्या मुलींना साबुदाण्याची खिचडी, दही, शेंगदाण्याचा लाडू, फ्रूट सॅलड, बटाट्याच्या आणि साबुदाण्याच्या तळलेल्या पापड्या असा खाऊ देऊन गावातर्फे त्यांचे कौतुक केले जाते, काही जण छोटेसे बक्षीसही देतात.

दक्षिण कर्नाटकात गणपतीच्या आदल्या दिवशी 'सुवर्णगौरी'चे आगमन होते. 'सुवर्णगौरी' म्हणजे गणपतीबाप्पाची आई, तिच्या मुलासाठी म्हणजे गणपती येणार म्हणून घरी काय काय तयारी केली आहे, ते पाहायला ती येते, असा समज आहे. त्यामुळे त्या दिवशी तिच्यासमोर गणपतीबाप्पासाठी केलेला सर्व खाऊ म्हणजे लाडू, चकल्या, करंज्या, वेगवेगळया भाज्या, फुले, पुस्तके ठेवतात. गणपतीच्या दिवसांसाठी बसवलेल्या करमणुकीच्या कार्यक्रमांची रंगीत तालीमही 'सुवर्णगौरी'समोर करतात. सुवर्णगौर संतुष्ट झाली की, ती आनंदाने गणपतीबाप्पाला आपल्या घरी पाठवते, अशी समजूत आहे.
गणपतीबाप्पांच्या पूजेसाठी २१ वेगवेगळया पत्री गोळा केल्या जातात. पारिजातक, बोरं, देवदारू, विष्णूक्रांता, मधुमालती, बकुळ, कण्हेरी, जाई, पिंपळ, मरवा, डाळिंब, शमी, धोतरा, रुई, माका, तुळस, आघाडा, दूर्वा, माका, हादगा, केवडा. या सगळ्या पानांचा पावसाळ्यातल्या आणि बाकीच्याही अनेक आजारांवर उपयोग होतो. गणपतीच्या दिवसांत ही सगळी पाने फूलवाल्यांकडे विकत मिळतात.

तुम्हांला गंमत माहिती आहे का, आमच्या कोल्हापुरातील काही जण २१ झाडांची पाने तोडण्यापेक्षा जून-जुलै महिन्यात एकवीस पत्रींची माहिती मिळवून किंवा इतर कोणत्याही २१ वनस्पती छोट्या कुंड्यांत लावून त्या कुंड्याच बाप्पासमोर ठेवतात. छान आहे की नाही ही कल्पना!

गणपतीबाप्पा घरी आले की, त्या दिवशी पेढे, गूळ-खोबऱ्याचे उकडीचे मोदक आणि पंचखाद्य असा नैवेद्य करतात. पंचखाद्य म्हणजे खारीक, खोबरे, खसखस, किसमिस आणि खडीसाखर यांचे मिश्रण. हे मिश्रण लहान मुलांसाठी पौष्टिक असते. कोकणात मोदकांबरोबर ओले खोबरे भाजून त्यात फुटाण्याच्या डाळीचे पीठ आणि साखर किंवा गूळ घालून मोठ्या करंज्या करतात. त्याला नेवऱ्या म्हणतात.

काही ठिकाणी काकडीच्या किसात तांदळाचे पीठ कालवून हळदीच्या पानातले गूळ-खोबऱ्याचे सारण घालून पातोळे करतात.

कोकणातल्या गणपतीच्या सजावटीची सर्वात मजा म्हणजे गणपतीबाप्पाच्या मखरावर एक लाकडी मंडपी (चौकट) लावतात. त्या मंडपीवर रानफुले आणि रानफळे लटकवतात. त्याला माटोळे/ माटवी/ अंबारी म्हणतात. ही सगळी फुले-फळे रानोमाळ फिरून गोळा करायचे काम घरातल्या मुलांचेच असते.

मराठवाडा आणि विदर्भात गणपतीच्या डोक्यावर लाकडी चौकटीवर तारेचे आकडे करून लाडू, करंज्या, गोड पात्या (तळलेल्या, न फुगलेल्या पुऱ्या) आणि चकल्या अडकवतात. त्याला फुलोरा म्हणतात.

गणपतीबाप्पाच्या नैवेद्यासाठी खवा, पेढा, मलई, पिस्ते, आंबा असे नाना तऱ्हेचे मोदक करतात. उकडीच्या मोदकाचेही खूप प्रकार असतात. तांदळासारखीच नाचणी, कणीक, ज्वारीची उकडही काढतात.

गणेशचतुर्थीच्या दुसऱ्या दिवशी उंदीर पंचमी असते. त्या दिवशी उंदराळे म्हणजे भरपूर तूप घातलेल्या कणकीच्या बोट्या उकळून त्याची गूळ-खोबरे घालून खीर करतात. काही ठिकाणी मका, शेंगदाणे, हरभरे, मूग, उडीद आणि चवळी उकळून घुगऱ्या करतात.



काही घरांत या दिवशी ऋषिपंचमी साजरी करतात. तुम्ही कधी ऋषिपंचमीची भाजी खाल्ली आहे का? ही भाजी फारच छान लागते. छोट्या गावांमध्ये अजूनही सगळ्या शेजारणी, मैत्रिणी आपापल्या घरातल्या भाज्या घेऊन एकत्र येतात. त्या भाज्यांमध्ये ओले खोबरे, मिरच्या आणि जिरं यांचं वाटण घालून मिश्र भाजी करतात आणि त्यात दही घालून खातात.

काही घरांमध्ये गणपती उत्सवाच्या काळात घरातील सगळे मिळून अथर्वशीर्ष म्हणतात. त्यावेळी दहीपोहे, मटकीची उसळ, करंज्या, चकल्या आणि कडबोळी असा खाऊ करतात. पश्चिम महाराष्ट्रात गणपतीबाप्पाला घरी परत घेऊन जाण्यासाठी म्हणून त्याची आई गौराबाई येते. गौरी म्हणजे गौरीची झाडे, केळीची झाडे किंवा मुखवट्याच्या गौरी किंवा उभ्या गौरी असतात. तिच्या स्वागतासाठी धपाटे, दहीभात, भाकरी, आल्यापाल्याची भाजी आणि आंबिल करतात.

विदर्भात त्यावेळी 'महालक्ष्म्यांचा सण' असतो. त्यावेळी दोन महालक्ष्म्या आणि त्यांची दोन मुले अशी सजावट असते. त्यावेळी तर पुरणपोळी, बेसनपोळी, सांज्याची पोळी, खिरी, अनारसे, लाडू, करंज्या, वडे, भजी, सोळा प्रकारच्या भाज्या, चटण्या, कोशिंबिरी, वाटली डाळ, पंचामृत, कढी, वरणभात आणि मसालेभात एवढा स्वयंपाक करतात. एवढा स्वयंपाक करायचा असल्यामुळे महालक्ष्म्यांची पूजा संध्याकाळी करतात. ज्यांच्या घरी महालक्ष्म्या बसवतात, त्यांच्या घरी त्यांचे सगळे नातेवाईक आणि मित्रमंडळी जेवायला जातात.

पश्चिम महाराष्ट्रातले सण त्या मानाने खूप सुटसुटीत असतात. गौराई गणपतीबाप्पाला न्यायला आली की, पुरणपोळीचे जेवण करून तिच्यासमोर गाणी म्हणतात आणि खेळ खेळतात. सीकेपी, सोनार यांच्यात गौरींसाठी मटणाचा नैवेद्य करतात.

तिसऱ्या दिवशी शंकरोबा येतो. शंकरोबा म्हणजे पांढऱ्या रानफुलांचे एक झाड आणि चाफ्याची पाने असतात. शंकरोबासाठी गुळाच्या पाकातली शेवखंड, फुटाण्याचे लाडू, दहीभात, काकडीचे वडे आणि साखरभात किंवा गव्हाची खीर करतात. त्याच दिवशी गौरी-गणपतीचे विसर्जन करतात. विसर्जनाच्या

दिवशी उडदाच्या आणि हरभऱ्याच्या डाळींची भजी, हरभऱ्याची ओली डाळ आणि तळलेले खव्याचे मोदक करण्याची पद्धत आहे. हल्ली बहुतेक लोक शाडूच्या गणपतीमूर्तीचे विसर्जन घरीच करतात. आमच्या कोल्हापुरात गणपती विसर्जन झाले की चिरमुरे आणि ओले खोबरे यांचा चिवडा करतात.

अनेक घरांत श्रावण महिन्यापासून ते गणेश विसर्जनापर्यंत कांदा, लसूण आणि मांसाहार अजिबात खात नाहीत. या दिवसांत खूप पाऊस पडतो आणि पचनशक्ती मंदावलेली असते. त्यामुळे पचायला जड असे पदार्थ खात नाहीत. त्यामुळे एकदा का गणपती विसर्जन झाले की लोक कांदा-खोबऱ्याचे वाटण घातलेली मस्त मिसळ किंवा कोंबडी, मटण आणि माशांवर ताव मारतात.

अनंत चतुर्दशी म्हणजे सार्वजनिक गणपती विसर्जनाचा दिवस. या दिवशी काही घरांमध्ये अनंताची पूजा करतात. त्या पूजेला खिचडीचा नैवेद्य करतात. प्रत्येक घरी वेगळे असते. काही ठिकाणी एकच नैवेद्य १४ घारगे किंवा चौदा लाडू असे करतात.



पूर्वी व्रतवैकल्यांना फारच महत्त्व होते. आता मात्र मनोबल वाढावे, सर्वांनी एकत्र यावे, आनंद वाटून घ्यावा, म्हणून आजही व्रतवैकल्यं केली जातात.

गणेशोत्सवासारखे सण मित्रमंडळी, शेजारी आणि पाहुण्यांच्या समवेत करण्याचे सण आहेत. या सणासुदीच्या वेळी रांगोळ्या, देखावे आणि सजावट करताना मुलांची कल्पनाशक्ती भरपूर वापरली जाते. सर्वजण मिळून काम करतात आणि आनंद एकत्र साजरा करतात. त्यावेळी घरातील मुलांमध्ये कल्पकता, नेतृत्व, समूहामध्ये शिस्तशीर काम करणे, एकमेकांमध्ये मैत्री, नातेसबंध, आणि आदराची भावना ठेवणे हे गुण आपोआप वाढीस लागतात. सार्वजनिक उत्सवाच्या ठिकाणी मुलांसाठी पाठांतर, संगीत, नाट्य आणि नृत्य यांसारख्या स्पर्धांचेही आयोजन केले जाते. त्यामुळे मुलांमधील कलागुणांनाही वाव मिळतो.

भाद्रपद महिन्यातल्या पौर्णिमेपासून अमावस्येपर्यंतच्या पंधरवड्याला पितृपंधरवडा म्हणतात. यावेळी आपल्या घरातील देवाघरी गेलेल्या पूर्वजांप्रती कृतज्ञता व्यक्त करायची असते. काही जण त्यांच्या स्मरणार्थ दानधर्म करतात. काही जण तांदळाची खीर, उकडीच्या पोळ्या, वडे, अळूची भाजी असा स्वयंपाक करून गरजूंना जेवायला बोलावतात.

तुम्हांला एक लक्षात आलंय का, श्रावण महिन्यापासून चार महिने सुरू होणारे हे जे सण असतात, या सणांना होणारा नैवेद्य म्हणजे अगदी साधासुधा, गरीब-श्रीमंत कोणालाही सहज परवडेल, असा असतो. त्यात वैविध्य आहे. काही लोक आपल्या आर्थिक परिस्थितीनुसार बडेजाव करतातच. पण मूळ सण कोणालाही साजरे करता येतील असे असतात.

या सणांचा मूळ गाभा म्हणजे कृतज्ञता व्यक्त करणे आणि सर्वांनी मिळून आनंद साजरा करणे हाच आहे. आपण जर तो गाभा लक्षात घेतला तर आपल्याला या सणांची अधिक मजा लुटता येईल.

**-डॉ. मंजूषा देशपांडे**
*dmanjusha65@gmail.com*
*(संचालक, लोकविकास केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)*

# जग-मित्र 'गूगल'



**आपल्याला** कुणी काही विचारलं आणि त्याचं उत्तर माहिती नसेल तर सहज आपण त्यांना- 'गूगल करून सांगतो' असं म्हणतो. या 'कुणी काही'मध्ये अगदी काहीही असू शकतं. 'अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष कोण आहेत?' इथपासून ते 'माझ्या घराजवळ सगळ्यांत छान हॉटेल कोणतं?' असा कुठलाही प्रश्न आपण गूगलला विचारला की, ते त्याच्या पोतडीतली माहिती आपल्यासाठी खुली करतं. मग अनेकदा आपण शोधत नसलेलीही कितीतरी छान छान माहिती आपल्यासमोर येते आणि आपण त्यात गुंतत जातो. 'गूगल' ही त्या अर्थाने 'खुल जा सिम सिम' म्हणताच उघडणारी अलिबाबाची गुहाच आहे, असं म्हटलं तरी हरकत नाही. आपल्या आयुष्याचा अनिवार्य भाग असलेलं हे 'गूगल' या महिन्यात त्याचा वाढदिवस साजरा करतं आहे. आपल्या प्रत्येक हाकेला माहितीचा खजिना घेऊन धावून येणाऱ्या या मित्राचा वाढदिवस आपण साजरा करायचा नाही, हे काही बरोबर नाही. म्हणूनच गूगलच्या जन्माची गोष्ट आज तुम्हांला सांगावी असं ठरवलं!

गूगलच्या जन्माची गोष्ट सुरू झाली १९९५ मध्ये. अमेरिकेतल्या स्टॅनफोर्ड विद्यापीठातून! गूगलच्या जन्मदात्यांपैकी एक असलेला लॅरी पेज तेव्हा स्टॅनफोर्ड विद्यापीठात शिकायला जायचा विचार करत होता. सर्गे बिन हा स्टॅनफोर्डमध्ये शिकत असलेला विद्यार्थी त्याला कँपस दाखवण्याच्या निमित्ताने भेटला. या भेटीत आपण दोघे पुढे जाऊन 'गूगल' नावाचा एक जग-मित्र जन्माला घालणार आहोत, अशी दोघांनी साधी कल्पनाही केली नसेल! पण तसं झालं खरं! असं म्हणतात की, सुरुवातीला त्या दोघांमध्ये सतत कुठल्या ना कुठल्या गोष्टीवरून खटके उडायचे. नंतर मात्र एका डॉरमिटरीमध्ये राहात असताना 'वर्ल्ड वाइड वेब'वर एक सर्च इंजिन तयार करण्याचं काम त्यांनी हाती घेतलं. गंमत म्हणजे 'गूगल' हे नाव घेतल्याशिवाय आपला दिवस जात नाही, पण लॅरी आणि सर्गे यांनी त्याचं केलेलं पहिलं नामकरण 'बॅकरब' असं होतं. पुढे ते बदललं आणि गूगल असं झालं. गूगल हे नाव आलं

**२६ सप्टेंबर हा गूगलचा वाढदिवस. यंदा गूगल २६ वर्षांचा झाला. त्याची जन्मकथा जाणून घेऊ या आणि त्याला 'थँक यू' म्हणू या.**

'गोगोल'वरून. १ वर १०० शून्य दिली असता त्याचं जे गणिती रूप होतं त्यावरून 'गूगल' हे नाव ठेवण्यात आलं. लॅरी आणि सर्गे यांचं ध्येय होतं, जगात असलेली सगळी माहिती संकलित करून ती सगळ्यांना सहजी उपलब्ध करून देणं! त्यांच्या त्या ध्येयाला साजेसं असं हे नाव म्हणजे गूगल!

दोन विद्यार्थ्यांनी एका खोलीतून सुरू केलेल्या सर्च इंजिनने पुढे सगळ्यांचं लक्ष वेधलं. शैक्षणिक संस्था आणि खासकरून सिलिकॅान व्हॅलीतल्या मोठ्या गुंतवणूकदारांना गूगलने भुरळ घातली. 'सिलिकॅान व्हॅली' हा अमेरिकेतल्या कॅलिफोर्निया शहरातला एक भाग आहे. टेक्नॉलॉजी आणि इनोव्हेशनशी संबंधित अनेक कंपन्यांची प्रचंड मोठी ऑफिसेस सिलिकॅान व्हॅलीत आहेत. आता 'मेटा' म्हणून ओळखलं जाणारं 'फेसबुक', 'गूगल', 'व्हिसा ॲपल' या कंपन्या तुम्हांला माहिती असतीलच. या सगळ्यांची आणि अशाच अनेक मोठ्या कंपन्यांची ऑफिसेस सिलिकॅान व्हॅलीत आहेत. सिलिकॅान व्हॅलीतील अँडी बेचटोलशेम यांनी लॅरी आणि सर्गे यांच्या गूगलमध्ये चक्क एक लाख अमेरिकन डॉलरची गुंतवणूक केली आणि अधिकृतपणे Google Inc जन्माला आलं. गूगलची वाटचाल स्वतःच्या ऑफिसमधून सुरू झाली.

गूगलच्या त्या पहिल्या ऑफिसची जागा कॅलिफोर्नियातल्या मेन्लो पार्कमध्ये होती. सुझान वोझिकी ही त्या जागेची मालकीण. ही पूर्वी गूगलची कर्मचारी होती. तिची आणखी एक ओळख म्हणजे ती यू ट्यूबची माजी सीईओ आहे! एक क्लंकी डेस्कटॉप कॉम्प्युटर, एक पिंगपाँग टेबल आणि चकचकीत निळं कार्पेट असा त्या ऑफिसचा एकूण थाट होता. तो प्रवास आता कॅलिफोर्नियातील माउंटन व्ह्यू इथे असलेल्या सध्याच्या भव्यदिव्य ऑफिसपर्यंत झाला आहे. हे ऑफिस 'द गूगलप्लेक्स' म्हणूनही ओळखलं जातं.

तुमच्यापैकी अनेक जण अभ्यासाच्या निमित्ताने नियमित इंटरनेट वापरत असाल. 'गूगल सर्च'चा तुम्हांला त्यात खूप उपयोग होत असेल. 'गूगल सर्च' हे जागतिक स्तरावर सर्वाधिक वापरलं जाणारं सर्च इंजिन आहे. हे सर्च इंजिन हे गूगल कंपनीचं उत्पादन आहे. तुमचा स्वतःचा मेल आयडी आहे का? त्याचा शेवट @gmail.com असा आहे का? हे जीमेलही गूगलचंच प्रॉडक्ट आहे. प्रवासात आपण वापरत असलेले गूगल मॅप, गूगल ड्राइव्ह, गूगल फोटोज, गूगल क्रोम, अँड्रॉइड फोनवरचं गूगल प्ले स्टोअर ही सगळी गूगलची प्रॉडक्ट्स आहेत. म्हणजे बघा, आपलं आयुष्य गूगलने किती व्यापलंय!

तुम्ही कधी गूगल ट्रान्सलेट वापरून पाहिलंय का? गूगलची ही सेवा सुमारे १३३ भाषांमध्ये उपलब्ध आहे. तिच्या मदतीने एखाद्या परदेशी भाषेतल्या वाक्याचा साधारण मराठी अर्थ काय होतो हे तुम्ही जाणून घेऊ शकता. गूगल लेन्ससुद्धा




अत्यंत भन्नाट काम करतं. तुमच्या बघण्यात एखादं नवीन झाड आलं किंवा पक्षी आला, तो कुठला आहे हे तुम्हांला माहिती नसेल तर स्मार्टफोनमध्ये त्याचा फोटो काढून तो गूगल लेन्समध्ये बघितला, तर त्या झाड किंवा पक्ष्याची माहिती तुम्हांला मिळू शकते.

गूगलचा समावेश जगातल्या मोठ्या कंपन्यांमध्ये होतो, हे तर तुम्ही सगळे जाणताच. पण त्यामुळेच गूगलने केलेल्या प्रत्येक गोष्टीची चर्चा होते. ‘गूगल डूडल’ हा गूगल वापरणाऱ्या प्रत्येकाच्या अगदी जिव्हाळ्याचा विषय. एखाद्या खास दिवशी गूगलचं डूडल कसं असेल याची उत्सुकता सगळ्यांनाच असते. पहिलं ‘गूगल डूडल’ १९९८ मध्ये आलं. ऑक्सफर्ड डिक्शनरीतही ‘गूगल’ या शब्दाचा समावेश आहे. जीमेलची घोषणा गूगलने १ एप्रिल २००४ ला केली. १ जीबी स्टोअरेज देत असल्याचंही गूगलने सांगितलं. त्यावेळी ईमेल सेवा देणाऱ्या कंपन्या २-३ एमबी स्टोअरेज देत होत्या. त्यामुळे अनेकांना १ जीबी स्टोअरेज देणारं जीमेल हे एप्रिल फूलच वाटलं होतं म्हणे! गूगल जसा माहितीचा खजिना आपल्यासाठी उघडतं, तसाच गूगलबद्दलच्या माहितीचाही प्रचंड खजिना आहे. तो वाचणं खूप इंटरेस्टिंग आहे. ‘द गूगलप्लेक्स’ या गूगलच्या मेन ऑफिसच्या गार्डनमधलं लॉन छान राहावं यासाठी म्हणे लॉनमोव्हर्स नाहीत तर चक्क शेळ्या आहेत. का माहितीये? लॉनमोव्हर्समुळे खूप प्रदूषण होतं, ते टाळण्यासाठी शेळ्या हा इको फ्रेंडली पर्याय! आहे ना गंमत? शिवाय हे ऑफिस पेट फ्रेंडलीही आहे. म्हणजे इथले कर्मचारी त्यांच्या पाळीव प्राण्यांना स्वतःबरोबर ऑफिसला आणू शकतात! ऐकावं ते नवलच ना?

आपलं भारतीयांचंही गूगलशी जिव्हाळ्याचं नातं आहे. भारत ही गूगलसाठी एक महत्त्वाची बाजारपेठ आहे. त्यामुळे मुंबई, बेंगळुरू, हैदराबाद आणि गुरगावमध्ये गूगल इंडियाची ऑफिसेस आहेत. शिवाय, आपल्या सगळ्यांसाठी अभिमानास्पद गोष्ट म्हणजे गूगलचे सीईओ सुंदर पिचाई हे भारतीय वंशाचे आहेत.

‘गूगल’ हा गेल्या काही वर्षांत आपल्या सगळ्यांसाठी परवलीचा शब्द झाला. त्यामुळेच त्याच्याबद्दल जाणून घेऊन गूगलला वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊ या आणि त्याला थँक यू म्हणू या! आपल्या हाकेला नेहमी धावून येत असल्याबद्दल!

आणि हो! ही सगळी माहिती मी गूगलला विचारून, खात्री करून मगच तुम्हांला सांगते आहे!

**-भक्ती बिसुरे**
*bhaktibisure@gmail.com*
(पत्रकार)

# अन्नसाखळी

पाऊस आला, पाऊस आला
डराव डराव बेडूक आला..

बेडका बेडका माजलास काय?
गाल फुगवून ओरडतोस काय?

किटले कान आवाजानं
का बरं पाठवलं तुला देवानं?

बटबटीत डोळे, खडबडीत पाठ
पोहत गाठतोस तळ्याचा काठ..

शेतात आमच्या फिरायचं नाय
आम्हांला तुझा उपयोग काय?

... डराव डराव, डराव डराव
बेडूक म्हणतो थांबा राव..

शेतात तुमच्या फिरलो नाही
किडे मकोडे खाल्ले नाही

मग तुमचे पीक येणार कसे?
धान्य तुम्हांला मिळणार कसे?

कीटक जगतात धान्यावर
मी जगतो कीटकांवर...

माझ्यावर कोण जगतो भला?
पळा, पळा, नागोबा आला!

**–प्रा. सुहास द. बारटक्के**
*suhasdbartakke@gmail.com*
*(ज्येष्ठ साहित्यिक)*

*चित्र- वैष्णवी माहीमकर*



# छकुलीच्या 'मॅडनेस'

**गौरववर** आरोप झाला! नको तो आरोप होता तो. दहावीचं वर्ष. अभ्यासाचा ताण. त्यात हा असा आळ. तोही मुलीने घेतलेला. चोरीमारी नव्हे, तर थेट वर्तनाच्या बाबतीत आरोप.

गौरवची झोप उडाली. 'त्या' मुलीचे, छकुलीचे पप्पा पोलिसांत जाणार असंही शार्दूलने, त्याच्या मित्राने, त्याच्या कानात सांगितलं. मला हे कळलं, पण गौरव असं काही करेल असं मला वाटलं नाही. मुद्दाम छकुलीला बाहेर बोलावून, गौरव आगाऊ वात्रटपणा करेल, हे पटेना.

'वर्गशिक्षक' या नात्याने मीच मग मुलांच्या वसतिगृहाकडे वळलो. होस्टेलचे रेक्टर तेरेदेसाई सर गौरववर प्रचंड चिडले होते. मी गौरवला स्वतः भेटलो.




एकट्याशी गप्पा केल्या. प्रेमाने विचारलं, "गौऱ्या, तू माझ्यापासून कधी काही लपवलं नाहीस. माझा तुझ्यावर विश्वास आहे. आय ट्रस्ट यू! खरं काय झालं ते सांगून टाक."

('छकुली' हे तिचं घरचं लाडाचं नाव, पण आपण तेच नाव गोष्टीत घेऊ या.) गौरवने जे काही घडलं ते मला सांगून टाकलं.

तो एक मैदानी खेळाडू



चित्र- अदिती पाध्ये-देसाई

आहे. व्यायाम करतो. मुलींना आवडतो.

गौरवशी बोलून झाल्यावर मी छकुलीकडे गेलो. त्याआधी तिच्या खास मैत्रिणींना विश्वासात घेऊन काही माहिती घेतली. छकुली काही वाईट मुलगी नाही, पण तिची चूक झालीच होती. कोवळ्या वयात होतात अशा चुका. मला काही त्या नवीन नव्हत्या.

मी फालतू आढेवेढे न घेता छकुलीला थेटच विचारलं, "तुला गौरव आवडतो ना? तूच तसं मैत्रिणींना सांगितलंस. गौरवला चिठ्ठी पाठवलीस. हो ना?"

घडलं असं होतं की, तिने पाठवलेली ती चिठ्ठी त्याने फाडली नाही. तशीच ठेवली. मलाही दाखवली. त्याने तिला वसतिगृहाच्या बाहेर बोलावलं. हे सांगायला की, मला अशा गोष्टी आवडत नाहीत. पुन्हा अशा चिठ्ठ्या पाठवू नकोस!

पण हे ऐकताच छकुली चवताळली! हा स्वतःला समजतो कोण? मला भाव देत नाही म्हणजे काय? मग छकुलीने तिथल्या तिथे ठरवलं की, गौरवला धडा शिकवायचा! तिने जोरजोरात खोटं भांडायला, ओरडायला सुरुवात केली. तिला वाटलं, सगळ्यांना तिचंच खरं वाटणार.

पण छकुलीचा अंदाज चुकला! मी शांतपणे खरं काय ते शोधून काढलं होतं. रागाच्या झटक्यात छकुली हे विसरली की, चिठ्ठीचा पुरावा गौरवकडे आहे. चिठ्ठीत प्रेमपत्र होतं.

हे सगळं नुसतं आकर्षण होतं. 'पपीलव्ह'! कोवळ्या वयातलं हे सो कॉल्ड प्रेम टिकतं कुठे? मेंदूतला 'रासायनिक वेडेपणा' असतो तो. जस्ट काइंड ऑफ केमिकल मॅडनेस!

छकुलीने हाच वेडेपणा केला होता. गौरवने दाद दिली नाही, आपलं प्रेम नाकारलं, आपल्याला ठोकरलं, असं तिला वाटलं.

मी छकुलीला सगळं नीट समजावल्यावर ती रडू लागली. तिची चूक तिला कळली. रागाच्या झटक्यात असं वागून कसं चालेल?

छकुलीला, तिचा कांगावा खोटा होता, हे मान्य करावं लागलं. एका मुलावर खोटा आरोप, अन्याय केल्याबद्दल तिला समज दिली.

'गौरवला तू भाऊ मान' वगैरे प्रकार मी अजिबात केला नाही. छकुली शांत, शहाणी झाली.

**–माधव गवाणकर**

*(नामवंत साहित्यिक)*

मोबा. ९७६५३३६४०८



*Illustrated by Juilee Mahimkar*

# Bappa's Motley Treat

**Raju** was busy at the Ganpati temple when someone covered his eyes from behind. They were familiar hands.

"Dada!" He shrieked, "I thought you won't come due to your exams." After completing his twelfth standard, Raju's elder brother Sanju studied at a college in nearby city and stayed at a hostel.

"How could I miss Ganpati and food fest?" Dada replied.

Raju's village enthusiastically celebrated the 'One Village, One

Bappa' model since a few years. Obviously, next ten days of the festival were going to be super-exciting with pujas-aartis, cultural programmes, and most importantly, their food festival 'Khauchya Gaavaat' which literally meant 'In the food's village'. Stalls of pani-puri, vada-pav, dosas, biryanis and variety of Indian cuisines made this fest very unique.

"Raju, I have a surprise!" Dada took Raju to a stall where table-top, gas-stove, steamers, frying pans and stainless-steel dabbas were kept.

"You booked a stall?"

"Taste this!" Dada gave Raju a steamed white dumpling.

"Ukadiche-modak! Competition with Aai, huh!"

Their mother took orders of ukadiche-modaks-white coloured steamed dumplings with filling of jaggery and coconut – as it was Bappa's favourite food and their mother's speciality!

"Hey, but these…" Raju frowned.

"… aren't ukadiche-modaks! They are ukadiche 'Momos'- steamed white dumplings with fillings of vegetables, paneer- just like modaks. I learnt them from a Nepali friend, Jagat in our hostel. We had put momos stall in college together and it was a massive hit. Since then, I have been thinking about starting business with this."

"Start-up! But who has done business in our family?"

"Aai's ukadiche-modak orders… Isn't that business?"

"Aai always cajoled you to help her with modak orders as you shape them so well and now that is helping you. No learning ever goes waste! In fact, you should name your stall 'Aai's momos… Modaks with a twist…!'"

"That's a brilliant idea!"

"What about college and studies?"

"Momos are mostly sold in evenings. I can attend my morning college; afternoons will be for momos' preparation and in evenings we'll sell them. Jagat is there to help, we can manage. Raju, this momos' concept is new to our village. Everyone will get a different item to taste and I can do good business."

"And gain experience. I'm sure Aai knows about all this. What about Baba? Who will bell the cat?"

"You! His sincere and studious son…!"

"You always make me a sacrificial lamb whenever you want it your way. Fine! But I want a promise that your studies won't suffer... I know how much interested you are in 'Accounts' and 'Economics'…!" Raju

said sarcastically suddenly going into a 'thinking loop'.

"What happened?" Sanju was curious.

"I have an idea."

"Shoot!"

"Every year after the festival is over we see how filthy this place turns into! Left-overs and trash become nice haven for roaches and rodents! It badly stinks, right outside the temple! This year, how about having cleaner streets, segregated garbage bins, purified water and good sanitation facilities? In stalls, we'll use sanitizers, hand gloves, clean aprons and caps. Our country boasts of its varied street-food culture. Let's make it a hygienic 'Khauchya Swachh Gaavaat' fest!"



"I know about your interests towards 'Save Water', 'Clean Air' or 'Plant Tress' initiatives. We are definitely pressed on time but let's do it, bro!" Dada gave thumbs-up. Coincidentally, Raju's friends overheard their conversation and willingly came forward.

When Sanju and Raju enthusiastically reached home that evening, a furious Baba was waiting for them. He had come to know that Sanju had booked a food-stall.

"Raju, don't be Sanju's saviour this time." Baba warned when Raju came forward to speak.

"Dada makes really good momos." Raju replied.

"What are momos?"

"They are... Dada, you tell..." Initially, Sanju was afraid but with Raju's support, he slowly managed to explain and convince Baba.

"We know Dada is not much inclined towards studies but has promised it won't suffer. When he wanted to learn karate, he learnt it perfectly and earned a black belt, remember? I'm sure he'll excel even in his start-up as he is doing it wholeheartedly." Raju said maturely.

"Just a seventh standard boy... but you know to win hearts." Baba hugged Raju and Sanju knew he had got the consent.

Soon Bappa arrived and Raju became busy as a bee. His entire day went in helping Aai with her modak orders and Dada with his momo preparations. He became a parcel-boy delivering modaks and was promptly available to help Dada at his stall in the evenings. Between

all this, he was also preparing the 'Health and Cleanliness' project to promote cleaner village rivers for his science exhibition in school. He was thoroughly enjoying all this hustle-bustle with no grumbles whatsoever!

It was now the ninth day of Ganpati celebrations. Sanju and Raju were serving customers at their stall when someone commented while paying the bill, "Your momos are unique- spinach-cheese, carrot-beetroot, corn-peanuts... I am news reporter, Sangram. I have been travelling different villages during the festival to cover Ganpati celebrations. I observed that your village has set new standards for street-food – hygienic stalls, clean surroundings, filtered water..."

"All because of my younger brother Raju's initiative...!" Sanju called Raju ahead.

"How did you think about that, kiddo?"

"Our school had taken up Swachh Parisar- clean surroundings- initiative on the occasion of Independence Day last month. We picked plastic bottles, garbage, and many such litters from streets around the school. Inspired by that, 'Khauchya Swachh Gaavaat' initiative clicked! My friends supported me. Luckily, the word spread fast and many from the village chipped in to make it a success."

"People want these changes to happen but what we lack is inclination like yours." Sagram lauded Raju's efforts. He asked his cameraman roll the camera and recorded Raju's interview.

Next day was Ganpati Visarjan, a culmination of ten-day long fest. Dada's momos were a huge hit and there was an increasing demand for his 'spicy modaks'. On Raju's suggestion, Dada made a new offering of 'Dal Momos'-dumplings filled with spicy, ground, 'split chick peas'- for Bappa's return journey.

In the evening, when Raju was checking on Bappa's procession arrangements, Sanju came running with his mobile as Raju's interview was being telecast on a news channel shortly. Everyone applauded when reporter Sangram summarized, "...Bappa's offerings of modaks and momos fittingly represent the customary 'One Village, One Bappa' tradition gelled beautifully with 'Khauchya Swachh Gaavaat' innovation..."

As villagers watched Bappa's immersion, Raju wished quietly, "Bappa, relish our motley treat, until next year when we meet...!"

**-Prachi Mokashi**

*mokashiprachi@gmail.com*

# संकेत भाषा– आपली आद्य भाषा!

## संकेत भाषेचा शोध कोणी, कधी कसा लावला २३ सप्टेंबरच्या ‘International Sign Language Day’ निमित्त-

**कर्णबधिर** मुलांच्या गप्पा पाहिल्या आहेत कधी? मी कॉलेजला जाताना माझ्या लोकल ट्रेनमध्ये ३-४ मैत्रिणींचा ग्रूप असायचा. त्या मुली हाताच्या, बोटांच्या हालचाली करत भरपूर गप्पा मारायच्या, हसायच्या, खिदळायच्या. जाम गंमत वाटायची त्यांच्या आसपास बसल्यावर. हळूहळू आमची थोडी ओळख झाली आणि मग मीही त्यांच्याकडून त्यांची संकेत-भाषा जराशी शिकून घेतली. त्यावेळी दूरदर्शनवर कर्णबधिरांसाठी बातम्या प्रसारित व्हायच्या. मी मजा म्हणून त्या बातम्या बघून समजून घ्यायचा प्रयत्न करायचे; मात्र नीटपणे ही भाषा शिकून घ्यायचं मात्र राहून गेलं.

आमची एक जर्मन मैत्रीण आहे. तिला ऐकता, बोलता येत असूनही तिला खुणांची भाषा छान येते. घरात कोणीही संकेत भाषा वापरणारी व्यक्ती नसूनही ती मुद्दाम Sign Language शिकली. कारण अचानक कोणी कर्णबधिर व्यक्ती समोर आली, तर आपल्याला संवाद साधता आला पाहिजे, नाहीतर अनेकदा त्यांना हतबल वाटतं की, काय हे, आमची भाषा येतच नाही कुणाला! आणि मग या व्यक्ती बोलक्या समूहात एकट्या पडतात. त्यांना बोलके मित्र-मैत्रिणी असू शकत नाहीत.

स्वीडन, फिनलंड अशा काही देशांतल्या काही शाळांत सर्वांनाच Sign Language शिकवली जाते. कारण हेच की, ही भाषा वापरून बोलणाऱ्यांना समाजात वावरताना अडचण येऊ नये. काही देशांत असा नियम आहे की, वर्गात एक जरी मूल कर्णबधिर असेल तर त्या वर्गातल्या सर्वांना Sign Language शिकवायची, म्हणजे ते मूल सर्वांमध्ये मिळून मिसळून गप्पा मारू शकेल.

जगात जशा शब्द-भाषा अनेक आहेत, तशाच संकेत-भाषाही खूप आहेत. अनेक शब्द-भाषांची



बहीण म्हणून त्या त्या भाषेची स्वतःची संकेत-भाषा असते. त्या त्या समाजातील कर्णबधिरांसाठी ती विकसित केलेली असते. शिवाय प्रत्येक देशाची एक अधिकृत संकेत भाषाही असते. भारतातली Indian Sign Language लाखो कर्णबधिर व्यक्ती वापरतात, मग त्यांची मातृभाषा कोणतीही असो. अमेरिका, ब्रिटन, जपान यांनीही आपापली अशी एकेक अधिकृत संकेत भाषा निश्चित केली आहे.

संकेत भाषेचा शोध कोणी, कधी लावला? यावर एक निश्चित उत्तर नाही. कसे असेल? आदिमानव हाच संकेत भाषेचा पहिला संशोधक नाही का? कित्येक शतकांपूर्वी शब्द-भाषा विकसित होण्याच्या आधी, आद्यमानव एकमेकांशी कसे बोलत असणार?- हातवारे, हावभाव आणि घशातून आवाज! अवयव-बोली हीच तर पहिली संकेत-भाषा. त्यामुळे मानवी उत्क्रांतीत संकेत-भाषा हीच खरे तर 'आद्य भाषा' मानली जाते. पुढे १७५५ मध्ये फ्रान्समध्ये चार्ल्स मायकल यांनी पहिल्यांदा कर्णबधिरांसाठी शाळा सुरू केली. त्या शाळेसाठी त्यांनी एक खूण-भाषा विकसित केली. नंतर त्यात अनेक सुधारणा होत गेल्या.

संकेत-भाषा मुख्य प्रवाहात याव्यात, त्या शिकण्याची इच्छा समाजातील अनेकांना व्हावी यासाठी २०१८ पासून युनायटेड नेशन्सने २३ सप्टेंबर हा 'आंतरराष्ट्रीय संकेत भाषा' दिवस जाहीर केला. प्रत्येक देशाने आपल्या अधिकृत भाषांच्या यादीत आपापल्या देशाच्या अधिकृत संकेत भाषेला जागा दिली पाहिजे, ही जाणीव या निमित्ताने रुजली आहे. आपल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (२०२०) मध्येही सांकेतिक भाषा सर्वांनी शिकण्याची सूचना करण्यात आली आहे.

मानवाची भाषा कशी विकसित झाली, मुळात इतक्या भाषा का निर्माण झाल्या, त्यांची गरज माणसाला का वाटू लागली, याबद्दलची काही मजेदार माहिती तुम्हांला समजून घ्यायची असेल तर युव्हाल नोआ हरारी (Yuval Noah Harari-Sepiens) यांचे 'सेपिअन्स' हे मानवजातीचा इतिहास थोडक्यात सांगणारं पुस्तक जरूर वाचा. इंग्रजी आणि मराठीत अनुवादित झालेलं हे जगातलं एक लोकप्रिय पुस्तक आहे. माणसांच्या शाब्दिक विकासाचं एक आगळं कारण त्यांनी यात सांगितलं आहे, जे मला तरी फारच पटलं. मी सांगण्यापेक्षा तुम्ही वाचा आणि ठरवा, तुम्हांला ते पटतंय का?

असो. थोडक्यात काय तर संकेत-भाषा हीच माणसाची मूळ भाषा. तुम्हीही शिकायचा प्रयत्न करू शकता. नाहीतरी, शब्दांपेक्षा जास्त प्रमाणात आपण आपल्या हावभावांतून आणि देहबोलीतून व्यक्त होत असतोच की!

**-शुभदा चौकर**
*cshubhada@gmail.com*



# Hide & Seek

*Illustrated by Mahimkar Sisters*

Some objects are playing hide & seek on the pages below, can you find them all?










# वैतरणेतील शिडाची गलबतं दिसू लागली...

**आधी** गिरीभ्रमण, मग गिर्यारोहण या निमित्ताने गेली सुमारे ५० वर्षं मी डोंगरदऱ्यांत खूप भटकलो. भटकंतीत नवीन जागा, ऐतिहासिक स्थळं, प्रेक्षणीय इमारती हे तर दिसतंच, पण याशिवाय अनंत वेगवेगळी माणसं ओळखीची होतात. त्यांचे स्वभाव, त्यांच्या अद्भुत कहाण्या समजून घेता येतात. देशविदेशातील चालीरीती, खाण्याच्या पद्धती आणि असंख्य खाद्यपेयांचा मी अनुभव घेतला. गेल्या २० वर्षांत मला लेखनाची गोडी लागली. आधी लेख, मग कथा असं करता करता मी कादंबरी-लेखनही करू लागलो. कादंबरी-लेखनात तुमच्या अनुभवांपलीकडे खूप वाचन आणि संशोधन करावं लागतं. 'विश्वस्त' ही २०१७ साली प्रसिद्ध झालेली माझी दुसरी कादंबरी. या कादंबरीसाठी संशोधन करत असताना गवसलेली एक गंमत, एक वेगळाच अनुभव मी सांगणार आहे!

शनिवार २८ मार्च, २००९. दुपारचा एक वाजून गेला होता, पायाखाली डिझेल इंजिनची थरथर जाणवत होती. टळटळीत दुपार असूनही उन्हाचा चटका जाणवत नव्हता, कारण कुंडलिका खाडीवरून पश्चिमेकडून येणारा मस्त वारा! आदल्याच दिवशी गुढीपाडवा होता. रेवदंडा आणि चौल या परिसरातील एक ऐतिहासिक परंपरा म्हणून, दरवर्षी गुढीपाडव्याच्या दुसऱ्या दिवशी

शिडाच्या बोटींची शर्यत असते. आम्ही १५-२० मंडळी या शर्यतीची मौजमजा पाहायला आग्राव येथील दीपक मुंबईकर याच्या मच्छिमार बोटीवरून सफरीस निघालो होतो.

कुंडलिका नदी सह्याद्रीच्या कुशीत पश्चिम घाटावरील ताम्हिणी परिसरातील डोंगरवाडीजवळ उगम पावते. सुरुवातीचा अवखळ प्रवाह 'भिऱ्या'नंतर संथपणे कोलाड, रोहा असा प्रवास करत पश्चिमेकडे जातो. रोह्यानंतर सुमारे आठ किलोमीटर खाली गेल्यावर नदीचे खाडीत रूपांतर होते. हीच खाडी साळाव पुलानंतर थोड्याच अंतरावर अरबी समुद्रास मिळते. खाडीच्या मुखापाशी उत्तर टोकावर रेवदंड्याचा किल्ला, तर दक्षिण टोकावर कोर्लई किल्ला राखणदार म्हणून उभे आहेत. रेवदंडा दक्षिणोत्तर पसरलेलं आहे, तर त्याच्या किंचित पूर्वेला गर्द हिरव्या नारळ-पोफळीच्या वाड्यांमध्ये दडलेलं चौल गाव आहे. चौल हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अतिप्राचीन बंदर; ज्याचा उल्लेख इतिहासात चिम्युला, टिम्युला, साइभोर, चेऊल अशा विविध नावांनी आढळतो. घारापुरीच्या लेण्यातील शिलालेखातदेखील चौलचा उल्लेख आढळतो. चौल बंदरात १४७० साली आलेल्या रशियन दर्यावर्दीचं नाव– अफनासी निकीतीन. सुमारे दोन वर्षं या परिसरात राहून त्याने इथल्या जनजीवनाबद्दल एक पुस्तकही लिहिलं. त्याच्या नावाने उभारलेला स्मृतिस्तंभ रेवदंड्याच्या शाळेत आजही आढळतो. चौलचं प्राचीन नाव चंपावती किंवा रेवतीक्षेत्र. सुमारे तीन हजार वर्षांहूनही अधिक जुनं असं हे प्रसिद्ध बंदर. पण गमतीची गोष्ट म्हणजे आज याच चौल गावाला कुठेही समुद्री खाऱ्या पाण्याचा स्पर्शही होत नाही! पूर्वी म्हणे शितळादेवी मंदिराच्या पायऱ्यांना व्यापारी गलबतं लागत असत!



*शिडाच्या बोटींची शर्यत*

पाडव्याच्या दुसऱ्या दिवशी होणाऱ्या शिडाच्या बोटींची शर्यत पाहायला मागे एकदा आमच्या सोबत डॉ. विश्वास गोगटे आले होते. हा माणूस 'फिजिकल केमेस्ट्री' विषयातील तज्ज्ञ, परंतु त्यांनी अनेक वर्षं डेक्कन कॉलेजला पुरातत्त्व विभागात तज्ज्ञ म्हणून काम केलेलं. त्यांच्या पुढाकारामुळे चौल परिसरात अनेक उत्खनने करण्यात आली. आमच्या सोबत असताना चौलच्या प्राचीन इतिहासाबद्दल त्यांनी अनेक रंजक कथा सांगितल्या. याच गप्पांमध्ये एक विषय आला तो म्हणजे, 'मडफ्लॅट्स'!

बुजलेल्या खाडीला 'मडफ्लॅट्स' ही भौगोलिक संज्ञा वापरली जाते. याचा सोपा अर्थ असा की एखाद्या खाडीत गाळ साठत जातो (Silting), त्यामुळे खाडी बुजते. या बुजलेल्या खाडीच्या पट्ट्याला म्हणतात- 'मडफ्लॅट्स'. या जमिनीतील क्षारांमुळे इथे फारशा वनस्पती उगवत नाहीत. विश्वास गोगटे यांनी रेवदंडा आणि चौलच्या दरम्यान असलेले 'मडफ्लॅट्स' आम्हांला मुद्दाम दाखवले. हा 'बुजणे' प्रकार कदाचित २००-३०० वर्षांपूर्वी घडला असावा. बुचकळ्यात टाकणाऱ्या प्रश्नाचं मला उत्तर मिळालं होतं!

चौल या प्राचीन बंदराला विशेष महत्त्व होतं, याचं कारण म्हणजे चौलच्या पश्चिमेस दक्षिणोत्तर पसरलेलं रेवदंडा बेट. गुगल मॅप्स किंवा सॅटेलाइट



*हिरा डोंगरावरील दत्त मंदिर*



*रेवदंड मडफ्लॅट्स*

इमेजेस पाहिल्यावर हा प्रकार सहजपणे लक्षात येतो. रेवदंड्याच्या उत्तरेस असलेली बागमळा येथील छोटीशी खाडी किंवा अक्षीजवळील साखरखाडी यामुळे पूर्वीचे रेवदंडा हे बेट पश्चिम किनाऱ्यापासून विलग असावं. या बेटामुळे प्राचीन चौल बंदराला वादळी हवामानापासून सुरक्षितता लाभत असणार आणि म्हणूनच चौल हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील भरभराट पावलेलं महत्त्वाचं सुरक्षित बंदर! ही संकल्पना लक्षात घेतल्यावर शितळादेवी मंदिराच्या पायऱ्यांना खचितच गलबतं लागत असणार, हे ध्यानात येतं. थोडक्यात, ही केवळ आख्यायिका न राहता त्यात सत्याचा अंश आढळून आला. यानंतर गेल्या दशकात माझ्या चौलला अनेक खेपा झाल्या. प्राचीन इतिहासाकडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन मला गवसला होता.

'विश्वस्त'च्या कथानकात द्वारका, चौल आणि शूर्पारक या प्राचीन, समृद्ध आणि प्रसिद्ध बंदरांना विशेष महत्त्व आहे. 'शूर्पारक' म्हणजेच आजचं नालासोपारा! 'नाळा' आणि 'सोपारा' मिळून आजचं 'नालासोपारा' तयार झालं आहे. यातील 'सोपारा' म्हणजे प्राचीन शूर्पारक! या परिसरातील मनीष म्हात्रे या तरुणाशी छान ओळख, गप्पा झाल्या. मनीष हा खास वसईप्रेमी आणि चिमाजी आप्पांचा भक्त. त्याच्याकडे वसई ते अर्नाळा या भागातील ऐतिहासिक माहितीचा खजिना आहे. केवळ मनीषच्या आग्रहामुळे आम्ही गिरिझ गावातील 'हिरा' डोंगर पाहायला गेलो. 'हिरा' डोंगर ही जेमतेम दोनएकशे फुटांची टेकडी. चिमाजी आप्पांच्या वसई स्वारीच्या वेळेस म्हणजे १७३८ साली याच डोंगरावर टेहेळणीसाठी बांधलेला छोटासा 'वज्रगड' नावाचा किल्ला होता. आजकाल हा भाग 'खाजगी मालमत्ता' असल्याकारणाने किल्ल्याचे अवशेष गायब होत आले आहेत. महाराष्ट्रात ऐतिहासिक स्थळं 'खाजगी मालमत्ता' कशा होतात, हे एक गौडबंगाल आहे! 'हिरा' डोंगरावर एक लोकप्रिय दत्तमंदिर आहे. वसई परिसरातील शिल्पकार सिक्वेरा बंधू यांनी ही दत्ताची अतिशय देखणी लाकडी मूर्ती घडवली अशी याची कहाणी. या मूर्तीचे डोळे अत्यंत जिवंत भासतात. 'हिरा' डोंगर हा या भेटीतील शेवटचा टप्पा होता. देवळाबाहेरील उत्तरेकडील दगडी भिंतीवर बसून मी सारा आसमंत न्याहाळत होतो. उत्तरेकडे दिसणाऱ्या वैतरणा नदीचं पात्र पाहात असताना डोक्यात एक भन्नाट विचार डोकावला!

'हिरा' डोंगरावरून दक्षिणेकडे वसईची खाडी दिसते. पश्चिमेकडे अरबी समुद्र तर वायव्येकडील बेटावर अर्नाळ्याचा किल्ला आणि उत्तरेला दिसणारी पूर्व-पश्चिम दिसणारी वैतरणा नदी स्पष्टपणे



'विश्वस्त'मधील श्रीकृष्ण

जाणवते. पूर्वेकडे तुंगारेश्वराची डोंगररांग, तर उत्तरेकडे समोरच खाली पसरलेलं, इमारतींच्या जंगलात हरवलेलं सोपारा गाव दिसत होतं. आजच्या सोपारा गावाला म्हणजेच पूर्वीच्या 'शूर्पारक'ला कुठेही समुद्री खाऱ्या पाण्याचा स्पर्श होत नाही!

मला अचानक चौल आठवलं. मी पुनःपुन्हा सारा आसमंत निरखून पाहात होतो. समोरच्या चित्रात मला स्पष्टपणे 'मडफ्लॅट्स' दिसत होते. याचाच अर्थ असा की, वैतरणेच्या मुखाशी अर्नाळा बेट/किल्ला, मग दक्षिणोत्तर पसरलेलं 'नाळा', 'राजोडी' बेट, त्याच्या पूर्वेला 'मडफ्लॅट्स' आणि त्याच्याही पूर्वेकडील भूभागावर सोपारा म्हणजेच 'शूर्पारक' असणार! पश्चिमेकडील बेटामुळे वादळी हवामानापासून सुरक्षितता, संरक्षक अर्नाळा किल्ला आणि वैतरणेतून किंवा वसईच्या खाडीतून या बंदराला पोचता येत असणार. ऐतिहासिक चौल येथील भौगोलिक रचनेचं हे जणू प्रतिबिंब होतं. गेल्या काही सहस्र वर्षांत समुद्राची पातळी २५-३० फुटांनी वाढली आहे, असं वाचल्याचं आठवलं. डोक्यात अनेक विचार, सिद्धान्त यांची सरमिसळ झाली होती, पण हळूहळू संगती लागू लागली. एकीकडे मी तुटक वाक्यांत, उत्साहाच्या भरात सोबत असलेल्या निर्मल आणि मनीषला ते सारं सांगत होतो; तर दुसरीकडे माझं मन 'युरेका' म्हणत आनंदाने नाचत होतं.

'हिरा' डोंगरावर उभं असताना अचानक माझ्या डोळ्यांसमोरचं चित्र धूसर होऊ लागलं.. मोठी शिडाची गलबतं वैतरणेतून शूर्पारक बंदराकडे येत असलेली दिसू लागली!

"विजयकेतू गलबताचा सरखेल, वज्रसेन तशाही परिस्थितीत निर्धाराने शूर्पारक बंदराकडे निघाला होता. त्यानं तसं वचन भगवान श्रीकृष्णाला दिलं होतं! अनामिक अंतःस्थ वेदनेनं करकरणारे दोरखंड आणि गलबताची कचकचणारी निर्जीव लाकडं, एखाद्या मुक्या प्राण्यागत अबोलपणे विव्हळत होती. गलबतावरील नऊ जणांना खवळलेल्या सागराने कधीच गिळंकृत केलं होतं! गलबत धडपडत शूर्पारक बंदराच्या आडोशाला, दगडी कठड्याला धाड्कन आवाज करत कसंबसं येऊन टेकलं. काठावरून फेकल्या गेलेल्या दोरखंडांनी बांधून घेत गलबत सुरक्षित करण्यात आलं. थकला-भागलेला वज्रसेन धक्क्यावर उतरून खलाशांना आणि बंदरावरील कामगारांना घोंगावणाऱ्या वाऱ्यातही शोष पडलेल्या कंठाने भसाड्या आवाजात ओरडून वेगवेगळ्या आज्ञा देत होता."

'विश्वस्त' कादंबरीतील एक थरारक प्रसंग माझ्या मनात आकार घेत होता!

शाळेत असताना इतिहास आणि भूगोल हे तसे नावडते विषय होते. 'इतिहास' म्हणजे रजिया सुलतानला मिशा काढणे किंवा 'भूगोल' म्हणजे भारताच्या नकाशावर कोळशाच्या खाणीच्या काळ्या टिकल्या लावणे! पुढे सातवी, आठवीत



*वसंत वसंत लिमये निसर्गाच्या सान्निध्यात*




असताना शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांची ‘शिवचरित्र व्याख्यानमाला’ ऐकण्याचा योग आला. ते संस्कारक्षम वय, बाबासाहेबांची अभ्यासपूर्ण रसभरित वाणी हा साराच प्रकार अत्यंत रोमांचकारक होता. पुढच्याच वर्षी ही व्याख्यानमाला मी पुन्हा संपूर्ण ऐकली. यामुळेच शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला माझ्या मनात एक विशिष्ट स्थान प्राप्त झालं. कॉलेजात गेल्यावर ट्रेकिंग, भटकंतीचा नाद लागला. या सुमारास मी प्रथमच राजगडावर गेलो. संध्याकाळच्या वेळेस पद्मावती माचीवर राजसदरेपाशी मी एकटाच बसलो होतो. लालसर किरणांच्या सोबतीने पाठोपाठ अलगदपणे येणारा काळोख समोरच्या आसमंतावर हलकेच पसरत होता. पूर्वेला दिसणारं गुंजणमावळ, उत्तरेकडे पसरलेलं कानंदी नदीचं खोरं आणि पाठीशी ठाकलेला काळाकभिन्न बालेकिल्ला. मी त्या वातावरणात हरवून गेलो होतो. ऐन तारुण्यातील महाराज असेच इथे अनेकवेळा उभे असतील, हा विचारच अंगावर काटा आणणारा होता. यानंतर अनेकदा राजगडला खेपा झाल्या. दोन-तीन वेळेस बाबासाहेब आणि गोनीदा यांचीदेखील राजगडावर भेट होण्याचा योग जुळून आला. राजगडासारख्या ठिकाणी या दोघांच्या तोंडून महाराजांचा इतिहास ऐकायला मिळणं ही एक पर्वणी होती! माझ्या नकळत इतिहास आणि भूगोल या दोन पेडांची घट्ट वेणी घातली जाऊ लागली होती. आता मागे वळून पाहताना लक्षात येतं की, मला इतिहास आणि भूगोल असा स्वतंत्रपणे विचारच करता येत नाही! आजकाल ऐतिहासिक गोष्टी ऐकत असताना तेव्हाचा, त्याकाळचा भूगोल डोळ्यांसमोर साकारू लागतो; तर गूगलवर नकाशांचा अभ्यास करत असताना तिथल्या ऐतिहासिक घटना जिवंतपणे डोळ्यांसमोर उलगडू लागतात.

असं झालं की, एखाद्या किल्ल्याचे चिरेदेखील तुमच्याशी इतिहास बोलू लागतात! एक नक्की की, इतिहास आणि भूगोल यांचा साकल्याने विचार करता, अभ्यास करताना आपली या जमिनीत, संस्कृतीत रुजलेली मुळं आणखी घट्ट होत जातात. आपले संस्कार, संस्कृती यांचा अभिमान शिकवावा लागत नाही, तर तो उपजत असल्याची ओळख होते!

**–वसंत वसंत लिमये**
*vasantlimaye@gmail.com*
*(ज्येष्ठ लेखक)*

## Some English Trivia

# Witty Talks

**Noundita :** *What are you doing?*

**Verbojith :** *Taking out shoes from the shoe rack to polish...*

**Noundita :** *This word 'polish' is an action word 'to polish'. When you capitalize it...*

**Verbojith :** *Capitalize?*

**Noundita :** *When you write the first letter of a word in capital, i.e., Polish...*

**Verbojith :** *Then it becomes a nationality, great! Polish language, Polish people...*

**Noundita :** *Yes! That's English for you!*

**Verbojith :** *And it isn't the official language of England. So ironical!*

**Noundita :** *Exactly! Though English is the most commonly used language, there are even some native languages spoken such as Welsh in Wales, Gaelic and Scots in Scotland, Irish and Ulster Scots in Northern Ireland...*

**Verbojith :** *Yesterday, I stumbled upon a page of different collective nouns in English on the Internet.*

**Noundita :** *Aha! A group of people, a herd of elephants, a swarm of bees... right?*

**Verbojith :** *But have you heard about a school of fish?*

**Noundita :** *A school of fish? This is funny. I had heard about an army of ants, a tower of giraffes.*

**Verbojith :** *I think these collective nouns used with animals mostly indicate their physical features. See, giraffes are tall like a tower so, a tower of giraffes.*

**Noundita :** *Yes. It's a tower when a group of giraffes are standing. When they are on the move, their group is called a journey of giraffes. Likewise, a pride of lions, wearing their pride with pride... Or a dazzle of zebras, showing off their dazzling stripes...*

**Verbojith :** *Could you tell some more?*

**Noundita :** *Now, you take some efforts to research... What would be the collective nouns for a group of rhinos, a group of crocodiles, horses, tigers...?*

**Verbojith :** *Wait, wait! You are too fast. Let me take the bundle of wires to connect the computer.*

**Noundita :** *Where's your mobile phone?*

**Verbojith :** *Gone for polish, I mean, repairs...*

*Verbojith winked and Noundita smiled back.*

**-Prachi Mokashi** | *mokashiprachi@gmail.com*



# कावळ्यांच्या एकीचं बळ

**ही** गोष्ट आहे एका कावळ्याची. तहानलेल्या कावळ्याची गोष्ट तुम्हांला माहीतच आहे. ही गोष्ट आहे एका भुकेल्या कावळ्याची. तहानलेल्या कावळ्याची ती जुनी गोष्ट काल्पनिक होती. ही भुकेल्या कावळ्याची नवीन गोष्ट काल्पनिक नाही. खरीखुरी घडलेली आहे, अगदी काल-परवाच!

आपल्या शेजारच्या राज्यात, आंध्र प्रदेशात टाटीपाका नावाचं एक गाव आहे. तिथे अलीकडेच घडलेली ही गोष्ट. तिथे करीमचाचा नावाचे व्यापारी राहतात. ते चिकन शॉप आणि मटण शॉप चालवतात. कुत्रे, मांजरं आणि कावळे यांना मांसाचा वास फार लवकर लागतो. ते करीमचाचाच्या दुकानाजवळ सतत रेंगाळत राहतात. दगड भिरकावला की, कुत्रे, मांजरं पळून जातात. पण कावळ्याचं तसं नसतं. त्यांना इकडून हाकललं की, तिकडे जाऊन बसतात. तिरपी मान करून टेहळणी करत राहतात.

हा कावळा जरा धीटच होता. शिवाय तो भुकेला होता. करीमचाचाचं एक मटण शॉप आणि दुसरं चिकन शॉप दोन्ही दुकानं शेजारी होती. करीमचाचाची नजर कावळ्यावर आणि कावळ्याची नजर मांसावर.

करीमचाचा चिकन शॉपवर गेला. गिऱ्हाइकाला चिकन मापून देऊ लागला. कावळ्याने बरोब्बर संधी साधली. त्याने मटणाचा एक तुकडा उचलला आणि भुर्रकन् झाडावर जाऊन बसला. तुकडा गिळून पुन्हा 'काव काव' करत राहिला.

करीमचाचा मटण शॉपवर गेला.गिऱ्हाइकाला मटण मापून देऊ लागला. कावळ्याने बरोब्बर वेळ साधली. चिकनचा एक तुकडा चोचीत घेऊन भुर्र पळाला. टेलिफोनच्या तारांवर जाऊन खात बसला.

करीमचाचा आणि कावळा यांचा खोखोचा खेळ चांगलाच रंगला होता. करीमचाचा कावळ्याचा पाठलाग करून वैतागला होता. त्यांनी कावळ्याला अद्दल घडवायचं ठरवलं.

आपला डोळा चुकवून कावळा नक्की येणार, हे करीमचाचाला पक्कं माहीत होतं. करीमचाचाने जरा आडोसा धरला. कावळ्याला वाटलं, करीमचाचाचं लक्ष नाहीये. आता चांगली संधी आहे. पंख पसरून कावळा मटण शॉपवर उतरला. मटणाचा तुकडा उचलून पसार होणार, इतक्यात करीमचाचाने झडप घालून कावळ्याला पकडलं. कावळा 'काव काव' करू लागला. कदाचित त्याच्या भाषेत तो 'सॉरी सॉरी' म्हणत असेल. पण करीमचाचाला कावळ्याची भाषा कशी समजणार? कावळा चोच मारण्याचा प्रयत्न करू लागला. करीमचाचाच्या पकडीतून सुटण्याचा प्रयत्न करू लागला.

करीमचाचा इरेलाच पेटले होते. ते कावळ्याला म्हणाले, "तू मला सकाळपासून सतावतो आहेस. थांब, आता मी तुला चांगलीच अद्दल घडवतो". करीमचाचाने एक लांब दोरी घेतली आणि कावळ्याच्या एका पायात बांधून टाकली. दोरीचं दुसरं टोक स्वतःजवळच्या खुंटीला बांधून टाकलं.

आता आली का पंचाईत!

थोड्या वेळापूर्वी कावळा स्वतंत्र होता. आता तो बंधनात अडकला होता. त्याने दोरीसह उडण्याचा

प्रयत्न केला. पण दोरी काही पिच्छा सोडत नव्हती. कावळ्याला उडूही देत नव्हती. कावळा पंख पसरून फडफडत होता. धडपडत होता. पुन्हा जमिनीवर पडत होता. कावळा जिवाच्या आकांताने ओरडत होता. कावळ्याची फजिती पाहून चाचा हसत होते. कावळ्याला चिडवत होते.

कावळ्याची ‘कावकाव’ वाढतच गेली. ते पाहून शेजारचे लोक जमा झाले. गंगाधर सावकार म्हणाले, “मुक्या जिवाला का छळतोस रे? दे सोडून.”

“हा मला सकाळपासून छळतोय. त्याचं काय?”




चित्र- विवेकानंद पाटील

करीमचाचा तक्रारीच्या सुरात बोलले.

"चिमण्या शेतातील धान्य टिपतात, म्हणून काही शेतकरी चिमण्यांना बांधून ठेवत नाहीत. मुक्या जिवांचाही वाटा असतोच आपल्या घासात." नंदूशेठ समजुतीच्या सुरात बोलले.

"मुक्या जिवाचा शाप लागेल. अरे भाई, सोडून दे कावळ्याला. अल्ला देख रहा है", फारुकभाईंनीही समजूत घातली.

सगळेच समजावून सांगत होते, पण करीमचाचावर त्याचा काही परिणाम होत नव्हता. त्यांना कावळ्याला धडा शिकवायचा होता. इकडे लोकांची आपसात चर्चा वाढली होती आणि तिकडे कावळ्याची 'काव काव' वाढली होती. ओरडून ओरडून कावळ्याचा घसा बसला होता. आता त्याचा आवाजही बदलला होता. तो आवाज 'धाव धाव' असाच वाटत होता.

कावळ्याची 'काव काव' ऐकून इतर कावळ्यांना आपला भाऊ संकटात सापडला आहे, हे समजले असेल. त्याच्या मदतीला दुसरा एक कावळा धावून आला. लगेच तिसरा आणि चौथा कावळाही आला.

बघता बघता पंचवीसेक कावळे जमा झाले. पहिल्या कावळ्याला धीर देऊ लागले. करीमचाचाच्या अंगावर झेप घेऊ लागले. करीमचाचाच्या डोक्यात चोच मारू लागले. कावळ्यांचा कलकलाट फारच वाढला. काही कावळे झाडांवर बसले. काही दुकानांच्या छपरावर बसले. काव काव आणि काव काव! दुसरा आवाजच ऐकू येईना.  कानठळ्या बसल्या अगदी!

कावळ्यांचे कळप टाटीपाका गावात गोळा झाले. घिरट्या घालू लागले. जणू कावळ्यांनी मोर्चा काढला होता. सगळं आभाळच काळंभोर झालं होतं. लोकांना समजेना, गावात इतके कावळे का जमा झाले?

करीमचाचाने कावळ्याला बांधून ठेवल्याची बातमी गावभर पसरली. लोक मोठ्या संख्येने करीमचाचाच्या दुकानात, परिसरात जमा झाले. सगळ्यांनी करीमचाचाची कानउघडणी केली. प्राणीप्रेमी गटाने मुक्या जिवाचा छळ केल्याबद्दल पोलिसांत तक्रार केली.

पोलीस धावत आले. त्यांनी करीमचाचाला ताब्यात घेतलं. कोणत्याही मुक्या पक्ष्याला, प्राण्याला अमानवी पद्धतीने वागवायचं नाही, अशा शब्दांत समज दिली.

करीमचाचाला पश्चात्ताप झाला. त्यांनी कावळ्याची सुटका केली. तो भेदरलेला कावळा 'काव काव' करत भुर्रकन् उडून गेला. कदाचित तो करीमचाचाला 'धन्यवाद' म्हणाला असेल. बघता बघता हजारो कावळ्यांच्या कळपात तो सामील झाला. त्याला सोबत घेऊन हजारो कावळ्यांचा कळप दिसेनासा झाला. कावळ्यांची एकी पाहून लोक आश्चर्यचकित झाले होते.

लोक आपापसांत चर्चा करत होते- "एका माणसाच्या मदतीसाठी दुसरा माणूस लवकर सापडत नाही, पण एका कावळ्याच्या सुटकेसाठी हजारो कावळे जमा झाले होते. हे आहे मुक्या जिवांच्या एकीचे बळ!" एक जण म्हणाला.

"मदत करण्याचं सोडून लोक अडचणीतल्या माणसाची फजिती बघत बसतात." आणखी एक जण बोलला.

"अपघात झाला, तर मदत करण्याऐवजी लोक त्याचे फोटो काढत बसतात," तिसरा म्हणाला.

"माणसाला माणुसकी शिकवणारा कावळा माणसापेक्षा शहाणा खरा!" सहावा म्हणाला.

"ह्या कावळ्यांकडून माणसांना खूप काही शिकण्यासारखं आहे..." लोक बोलतच होते!

**-डॉ. सुरेश सावंत**
*sureshsawant2011@yahoo.com*
*(नामवंत साहित्यिक)*

# 'ण'चे गाणे



ण, णा, णि, णी
ण, णा, णि, णी!
पायांमध्ये पैंजण
हातांमध्ये मणी!

टुणटुणनगरीत
वाजवत पिपाणी,
राणी नि त्रिवेणी
गेल्या दोघीजणी!

चणे नि फुटाणे
कणसातले दाणे,
त्रिकोणी चुलीवर
मांडली की खेळणी!

गरगर पाळण्यात
गायली हो गाणी!
एकोणीसचा पाढा
म्हणती दोघी जणी

चित्रात काढणार
गवळण हिरकणी!
ण, णा, णि, णी
ण , णा, णि, णी!


-डॉ. नीलिमा गुंडी
nmgundi@gmail.com
(भाषातज्ज्ञ)


चित्र- ऋचा दामले



मनोविकास

# मी नेमका कसा?



**रेयांश**, दीप, नील आणि ऋषी खेळत होते, आणि अचानक त्यांना भांडणाचा आवाज आला. बघितलं तर सोसायटीमधलीच काही मुलं एकमेकांशी भांडत होती. दीपने पाहिलं की, अरे यात आपला मित्र बिट्टू पण आहे. तो सगळ्यांना म्हणाला, "चला चला, आपल्याला पाहायलाच हवं, असं कसं ही मुलं आपल्या बिट्टूला मारू शकतात?"

नील म्हणाला, "जाऊ दे ना, आपल्याला काय करायचंय त्यांच्या भांडणाशी? बघतील त्यांचं ते."

रेयांश म्हणाला, "नको बाबा, उगीच आपल्याला काहीतरी व्हायचं, आपण त्यांना थांबायला सांगू या का? मला तर काही कळतच नाहीये, तुम्हीच ठरवा बाबा काय ते."

ऋषी म्हणाला, "हे बघ दीप, एकदम चिडून चालणार नाही. आपण जाऊ या तिकडे, काय झालंय ते समजून घेऊ या आणि मग ठरवू कोणाला समजवायचं ते."

सगळे निघाले, भांडणाच्या ठिकाणी पोचले. पण तोपर्यंत भांडण जवळजवळ संपलंच होतं.

या प्रसंगात आपण पाहिलं की, प्रत्येक मुलाची प्रतिक्रिया (reaction) वेगळी होती ना? असं का बरं असेल? प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व वेगळं, प्रत्येकाचा स्वभाव वेगळा. मग असंच होणार असं स्वाभाविकपणे आपल्याला वाटतं. म्हणजे नेमकं काय ते आपण समजून घेऊ या आणि शोधून पाहू या की, आपलं स्वतःचं व्यक्तिमत्त्व कसं आहे ते.

व्यक्तिमत्त्वाचे ढोबळमानाने चार प्रकार आहेत-

१. भिडस्त (Submissive)

२. आक्रमक (Aggressive)

३. तटस्थ (Passive)

४. आग्रही (Assertive)

आता आपलं हेच उदाहरण घेऊ या-

या सगळ्यांमध्ये पहिला प्रकार म्हणजे भिडस्त. कोण आहे बरं भिडस्त? तर तो रेयांश. रेयांशला वाटलं की, आपण या भांडणात पडलो तर कोणी आपल्याला ओरडेल का? आपल्याला काही होईल का? या भीतीने त्याने या भांडणात न पडायचं ठरवलं. पण तोही निर्णय त्याने त्याच्या मित्रांवर सोडला. म्हणजेच निर्णय घेतानासुद्धा त्याची तारांबळ उडाली.

दीप होता आक्रमक मनःस्थितीत. त्याला बिट्टूशी कोणी भांडण करतंय हे सहनच झालं नाही. तो लगेच बिट्टूची बाजू घ्यायला सरसावला. हे करताना कदाचित बिट्टूचीही चूक असू शकेल, हा विचारसुद्धा त्याच्या मनाला शिवला नाही.

नील म्हणाला, जाऊ दे ना आपल्याला काय

प्रत्येकाचं व्यक्तिमत्त्व वेगवेगळं असतं. तुझं कसं आहे? कसं असावं असं तुला मनापासून वाटतं? बदलू शकतो का आपण स्वतःचं व्यक्तिमत्त्व?

करायचं आहे. म्हणजे आपल्या मित्राला काही त्रास होतोय किंवा नाही याच्याशी त्याला काही देणं-घेणंच नव्हतं. आपण बरं आणि आपलं काम बरं! म्हणजेच नील तटस्थ राहिला.

ऋषी म्हणाला की, आधी समजून घेऊ या काय झालंय ते आणि मग ठरवू की काय करायचं ते. म्हणजेच ऋषीला त्यांना मदतही करायची होती, आणि त्याचबरोबर कोणावर अन्याय होऊ नये, अशीही इच्छा होती.

यातल्या कोणालाच आपण पूर्णपणे चूक किंवा बरोबर ठरवू शकणार नाही, कारण त्यांच्या अशा प्रतिक्रियांमागे त्यांचा त्यांचा, त्यांना बरोबर वाटतोय असा एक विचार आहे.

परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी त्यातल्या त्यात सुलभ मार्ग हा ऋषीच्या विचारात आपल्याला दिसतोय. दीपसारखं रागावून जर आपण तिथे गेलो तर बिट्टूला मदत होईलच याची खात्री नाही. रेयांशसारखं आपण घाबरून, गोंधळून गेलो तरीसुद्धा बिट्टूला मदत होणार नाही आणि नीलसारखे तटस्थ राहिलो तरीदेखील बिट्टूला मदत होणार नाहीच. बिट्टूला मदत होण्याची शक्यता ऋषीच्या वर्तनात दिसतेय.

आपल्या सगळ्यांमध्येच दीप, नील, रेयांश आणि ऋषीसारखी मनःस्थिती असते. प्रसंगानुरूप, परिस्थितीनुसार आपल्या या दीप, नील, रेयांश आणि ऋषीसारख्या प्रतिक्रिया बाहेर पडत असतात. मात्र आपण जास्तीत जास्त वेळा कसे वागतो, हे बघायला सुरुवात करू या? म्हणजे जिथे आक्रमक व्हायला वाव आहे, तिथे आपण कसे वागतो? उदाहरण घ्यायचं तर आपल्या लहान भावंडांशी वागताना आपण नेहमी Aggressive असतो की Submissive? आपण Passive असतो की Assertive? आई, बाबा, शिक्षक यांच्याशी वागताना आपण कसे वागतो आणि प्रत्यक्षात आपल्या मनात कोणते विचार असतात? हे सगळं आता लक्षपूर्वक पाहायला लागलात ना, तर आपल्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकार (Personality Type) लक्षात येईल. आपला Type Assertive असेल तर छानच. पण जर तो Passive, Submissive किंवा Aggressive असेल, तर तो आपल्याला महत्त्वाच्या निर्णायक प्रसंगांमध्ये त्रासदायक ठरू शकेल.

आपला Personality Type बदलता येणं शक्य आहे बरं का! आपल्या जवळच्या व्यक्तींमध्ये अशी एखादी Assertive व्यक्ती आपल्या नक्कीच डोळ्यांसमोर येईल. वेगवेगळ्या प्रसंगांमध्ये ही व्यक्ती कशी वागेल? याचा विचार आपण करू शकतो. किंवा या उदाहरणातला ऋषी कसा वागला असता? असा विचार करण्याची सवय आपण लावून घेतली तर हे आपोआप आपल्यातसुद्धा मुरत जाईल. जेव्हा राग येईल, भीती वाटेल किंवा जाऊ दे, आपल्याला काय त्याचं, असं वाटेल तेव्हा आपल्यातला 'ऋषी' बाहेर काढायचा.

हे का बरं करायचं? तर असे विचार किंवा दृष्टिकोन आपल्याला त्रासदायक ठरत नाहीत, आपली नाती चांगली राहण्यासाठी मदत करतात म्हणून. मग बघू या प्रयत्न करून?

**-वैदेही भिडे**
*vaidehi.bhide@gmail.com*
*(मानसिक आरोग्य कार्यकर्ता)*

लोककथा

चित्र- वैष्णवी माहीमकर




# अजब भूत

**एका** गावात एक गरीब म्हातारा माणूस राहात होता. आताशा त्याला काहीच काम झेपत नसे. तो रोज भिक्षा मागून स्वतःचा उदरनिर्वाह करत असे. एकदा एका धनाढ्य माणसाने त्याला जेवायचं आमंत्रण दिलं. त्या माणसाने आग्रहाने पती-पत्नी दोघांनाही जेवायचं आमंत्रण दिलं होतं. त्यांच्याकडे याला आणि याच्या बायकोला पोटभर वडे खायला मिळाले.

तिथे वडे खाल्ल्यानंतर या माणसाला आपण आता घरी वडे करून खावेत, अशी इच्छा निर्माण झाली. मग त्याने, येणाऱ्या भिक्षेतले तांदूळ थोडे

लोककथा लोभस असतात. वाचता वाचताच आपल्याला शहाणपणाच्या गोष्टी सांगतात; भाषेची गोडी जाणवून देतात. विदुषी दुर्गा भागवत यांच्या 'लोककथा' संग्रहातील गोष्टींचे हे थोडक्यात पुनर्लेखन-

थोडे करून बाजूला काढून ठेव, असं बायकोला सांगितलं. भिक्षा मागून उडीदसुद्धा आणले.

बायकोने जात्यावर भरडून उडदाची डाळ केली. दुसऱ्या दिवशी तांदूळ आणि उडीद भिजत घातले आणि वाटून त्याचे सुंदर वडे केले. बरोब्बर पाच वडे झाले. ते दोघे जेवायला बसले. दोघांनीही दोन-दोन वडे वाटून घेतले. आता एकच वडा उरला. याचं काय करायचं? तो नेमका कोणी घ्यायचा? अर्धा-अर्धा वाटून घ्यावा, हे काही कोणाला सुचलं नाही.

मग तो माणूसच म्हणाला, "आपण पाचही वडे झाकून ठेवू आणि डोळे मिटून गप्प पडून राहू. आपल्यापैकी जो कोणी आधी डोळे उघडेल आणि बोलेल, तो हरला असं समजायचं, कबूल?"

"हो कबूल." बायकोने मान डोलावली.

मग ते पाचही वडे झाकून ठेवून दोघेही झोपून राहिले.

दोन दिवस झाले तरी त्यांचं दार बंदच! शेजारीपाजारी घाबरले. जमा झाले. त्यांनी दार फोडलं. बघतात तर काय, हे दोघं मेल्यासारखे पडलेले. पण बोललो तर वडा जातो म्हणून दोघंही डोळे उघडायला किंवा बोलायला काही तयार होईनात. लोकांनी दोघांनाही गदागदा हलवलं तरी हलेनात.

दोघंही मेले असं समजून शेजाऱ्यांनी त्यांना ताटीवर बांधून स्मशानात नेलं. चिता रचली. त्यांना चितेवर ठेवलं आणि अग्नी दिला. पायाला विस्तव लागल्यावर दोघांपैकी नवरा म्हणाला, "मी हरलो... मी हरलो! तो वडा तूच खा."

बायको टुणकन उडी मारून म्हणाली, "ठीक आहे. काय भूक लागली आहे!"

त्यांचं बोलणं ऐकून शेजाऱ्यांना, त्यांची जणू भुतं उठलीयेत, असं वाटलं आणि ते सगळे भीतीने घाबरून पळत सुटले.

**-कांचन जोशी**
*kanchanpjoshi76@gmail.com*
*(संस्कृत अभ्यासक)*

## शब्दरंजन

**ताई-** बक्षीस समारंभात बोलताना शब्द जपून वापरा हं. स्वरा, आभार मानायचे की द्यायचे?

**स्वरा-** पाहुण्यांना धन्यवाद द्यायचे किंवा पाहुण्यांचे आभार मानायचे.

**ताई-** बरोबर. आणि हो, नुसतं एक फूल देऊन 'सत्कार केला' असं म्हणू नये! स्वागत केलं, असं म्हणावं!

**धीरज-** ताई, सुरुवातीला पाहुण्यांना विनंती पण करायची ना स्थानबद्ध होण्याची!

**ताई-** नाही रे! स्थानबद्ध करणं ही शिक्षा आहे. स्थान ग्रहण करण्याची विनंती करायची असते!

*(डॉ. नीलिमा गुंडी यांच्या 'शब्द गंमत' पुस्तकातून साभार)*



# Do you know about LIGO- India?

**Have** you ever thrown a stone into a pond and watched the ripples spread outward? Would it be surprising to learn that similar ripples or waves can occur in space as well?

Yes, this does happen and these waves are called the gravitational waves. Almost a 100 to 150 years ago Einstein predicted and stated something called the gravitational waves. We know about the electromagnetic waves and also its spectrum. Gravitational waves are something different. ‘Gravitational waves are ripples in space time. When objects move, the curvature of space time changes and these changes move outwards (like ripples on a pond) as gravitational waves.’

This is the basic definition but let’s dive deep into it. In simple words, when any object that has mass, moves, it creates ripples or waves around it. These waves then travel through space. To imagine this, let’s imagine a boat moving on water. We can see the ripples following the boat caused by that boat on the water. Even when a small duck swims in water it leaves ripples behind. Similarly, the ripples or waves that are formed by objects with mass

**When we throw a stone in water, we see ripples. Similarly, waves can occur in space. We do not see or feel them. These waves were detected by huge detectors called LIGO.**

in space are called the gravitational waves. So, we have mass too, right? So, do we create gravitational waves? Yes, we do. Isn't this interesting? Anything and everything around us that has mass can change the space time fabric and create ripples. If these waves travel through other objects, those objects expand and contract. Objects even such as you and me!

But how does this actually happen in space? When we talk about space, it includes not only the space outside earth but everything around us. Imagine the space to be a fabric like structure. If we keep an object say a ball, on this fabric, it will create a dip in the fabric. This dip is imagined as the gravity of that object. Now, if two such huge masses collide on the fabric they form wave like structures. When this happens in space, the ripples formed are called gravitational waves. Stars, plants, blackholes, all revolve around each other in space. If such massive objects collide or burst, massive intensity gravitational waves are created. The strongest gravitational waves are produced by events such as colliding black holes, supernovae, Binary stars, spinning or orbiting massive objects and colliding neutron stars.

But we can never see or even feel these waves around us. We cannot feel them passing through us. We even cannot see any of us getting contracted or stretched, right? This is because the gravitational waves produced by smaller masses are negligible and cannot be sensed. Only massive intensity waves can do this. Till today we as humans are only capable of detecting gravitational waves caused by massive explosions or collisions in space. Even these massive intensity waves travel from a far distance to the earth and take thousands of years to reach us, making us difficult to detect them. Yet, we tried and did detect them and the first successful attempt of detecting these waves happened on 14 September 2015.

These waves were detected by huge detectors called LIGO- Laser Interferometer Gravitational-wave Observatory. Two LIGO detectors are

# *Make your own stretchy Universe*

*As we imagined the space to be a fabric, we can actually make this at home. Do give it a try. You just need a sheet of elastic material like Dupatta or polyester Bedsheet and some heavy balls and marbles. This fabric is our space time fabric and the marbles resemble the celestial objects. Take the fabric and clamp it to a ring like structure or a plastic tub with cloth clips, the fabric should be tight enough to hold the weight of the ball. Refer the image to make the setup right. You may also need to hold the fabric in place during the experiment if needed. Put a heavy ball at the centre of the stretched sheet. This will create a dip in the sheet and now the sheet is no longer flat. Roll a small marble around the bigger ball. Observe as the marble goes in circles around the bigger mass. It looks as if the bigger ball is attracting the marble towards itself. This is how gravity of objects works in space. If the smaller marble is too far away from the dip it will not be pulled by the larger mass. It's just that the actual space has no friction unlike our fabric. And so the objects keep on going around the heavier mass. In this experiment the marble will eventually fall on the larger mass with larger dip. But massive objects in space do collide. Try this with two large balls on the fabric. Observe if you can see the ripples caused by the masses. These are nothing but the gravitational waves.*









stationed in USA, Virgo and GEO 600 are in Europe and Kagra in Japan. The most exciting thing of all is that, now a similar detector is being built in India. This detector will be called the LIGO India. Many Indian institutes are contributing in the construction and research of LIGO. The four main institutes among them are: The Raja Ramanna Center for Advanced Technology (RRCAT), located in Indore, Institute for Plasma Research (IPR) in Ahmedabad, Inter-University Centre for Astronomy and Astrophysics (IUCAA), Pune and The Directorate of Construction, Services & Estate Management (DCSEM) in Mumbai.

But how are these waves, travelling from a far distance from space detected by an observatory stationed on earth?

To understand this let's see how this detector is being built and how does it work? This detector has a laser source, interferometer, huge gold coted mirrors and long vacuum pipes. There will be two L shaped vacuum pipes or chambers levitating from the earth on a certain height, each of 4 km length. This L shaped structure has an interferometer at the center and a laser source at one end. The other two ends of the chambers have huge gold coted mirrors. Laser rays travel through these pipes in vacuum and reflect back from the mirrors. When gravitational waves pass through the Earth, the space time fabric would stretch and compress. This will make the chambers to stretch and compress too as we talked about earlier. This will cause change in the reflected laser beam. These laser beams are then studied by the scientists. Now you can imagine how precise and minute all these measurements would be. These detections can tell us much more about the universe. We can study systems like binary black holes. We will also gain a new insight into objects like neutron stars, which would not otherwise be possible.

This is going to be the first and the largest observatory in India till today, and this would be a very proud and happy moment for all of us. This project will be in Hingoli, Maharashtra. It will increase a lot of employment around the Hingoli area. After 5 to 7 years, students from all fields like data science, computer coding, astrophysics, mathematics, combinatorics, material science etc. will be needed to procure the data and analyze it at the observatory. It will create huge research opportunities for young minds like you.

**-Shivani Pethe Kane**
*shivaniokane@gmail.com*

## पकोडे

# टिटवी

**पकोडे, म्हणजे पक्षी कोडे!**
**पक्ष्यांचे मनोगत मांडणारे धमाल सदर!**

**आज** मी तुम्हांला फक्त माझीच नाही तर आमच्या 'द ग्रेट पिल्लांची' गोष्टही सांगणार आहे. ही गोष्ट वाचल्यावर तुम्हांला कळेल की, तुमच्या बावळट आणि घाबरट लहान मुलांपेक्षा आमची पिल्लं कशी चतुर आणि शूर आहेत ते!

अरेच्चा! पण मी कोण ते सांगायचं राहिलंच की! मला संस्कृत भाषेत 'टिट्टीभ' म्हणतात; तर माझे उद्योग बघून काहीजण तर मला 'पोरे चाळवणी' असंही म्हणतात. माझं इंग्रजी नाव Red-wattled Lapwing (रेड वॉटल्ड लॅपविंग) असं आहे; तर माझं शास्त्रीय नाव Vanellus indicus (व्हॅनेलस इंडिकस) असं आहे. पण यावरून बहुधा तुम्हांला काहीच कळणार नाही.

मला मराठीत किमान तीन नावं आहेत. 'टिटावडी' आणि 'टिटवरी'. आता तिसरं नाव तुम्ही शोधा. माझं नाव शोधण्यासाठी तुम्हांला क्लू देते. माझा आवाज तुमच्या ओळखीचा आहे. 'डिड यू डू इट! डिड यू डू इट! कतीत वत्! कतीत् वत!' हा माझा आवाज तुम्ही रात्री-अपरात्री ऐकलाच असणार. कारण मी रात्री वावरणारा पक्षी आहे.

तशी माझी लांबी ३२ ते ३५ सें.मी. आहे. मी तपकिरी रंगाची असते. पण मला ओळखण्याची मोठी खूण म्हणजे, माझ्या दोन्ही डोळ्यांपुढे असलेल्या लाल कातडीमुळे (wattle) मी इतरांपेक्षा चटकन वेगळी दिसते.

नद्या, तलाव, पावसामुळे तयार झालेली डबकी, इतकंच नाही, तर दाट जंगलातल्या पाणवठ्याजवळ राहायलादेखील मला आवडतं. आता आमच्यातलेच काहीजण खेडेगावांत, गावांत आणि शहरांतही राहतात. पसंद अपनी अपनी!

आमचं घरटं अगदीच साधं. जमिनीवर खरवडल्यासारखं करून तयार झालेला खळगा म्हणजे आमचं घरटं. आमच्या घरट्यातली अंडी आणि अंड्यांतून बाहेर आलेली पिल्लं परिसराशी अगदी एकरूप होऊन जातात. तुम्हीच काय, पण एखादा प्राणी जरी माझ्या घरट्याच्या बाजूने गेला तरी त्याला अजिबात कळणारच नाही की, बाजूच्या घरट्यात माझी पिल्लं झोपा काढत आहेत. घरट्यातली माझी अंडी किंवा पिल्लं शोधून काढण्यासाठी माणसांना भरपूर सराव करावा लागतो. त्यासाठी त्यांची नजर तयार व्हावी लागते.

माणसं आपल्या तान्ह्या मुलांना जवळ घेऊन दूध पाजतात. लहान मुलांना जवळ घेऊन भरवतात.

काहीवेळा जेवताना जर लहान मुलं मध्येच पळाली तर त्यांचे आई-बाबा हातात घास घेऊन त्यांच्या मागे-मागे पळतात. थोडक्यात काय, तर ही तान्ही मुलं स्वतःहून दूध पीत नाहीत, तर लहान मुलं आपल्याआपण टकाटक जेवत नाहीत.

खरं सांगते, आमची पिल्लं इतकी काही बावळट नाहीत. कारण मी आमच्या पिल्लांना चोचीने कधीही भरवत नाही. मी फक्त पिल्लांना त्यांचा खाऊ शोधून द्यायला मदत करते. मग पिल्लं आपापला खाऊ टकाटक चोचवतात. माझ्या पिल्लांना वाळवीसारखे कुरकुरीत कीटक, त्यांची चुरचुरीत अंडी आणि शिंपल्यातील मऊसर प्राणी खायला खूप आवडतात.

मी तुम्हांला माझं एक सिक्रेट सांगते. माझ्या घरट्याजवळ कुणी शिकारी पशुपक्षी येताना दिसला किंवा कुठलाही धोका आहे असं वाटलं, तर मी लगेच जमिनीवर उतरून, पंख पसरून जखमी असल्याचं सोंग करते. त्यामुळे त्या शिकारी पशुपक्ष्यांचं लक्ष माझ्याकडे जातं आणि माझी पिल्लं मात्र तिकडे सुरक्षित राहतात. म्हणून तर मला 'पोरे चाळवणी' असंही म्हणतात.

नदीच्या काठावर जागा असूनसुद्धा आमच्यातले काही नदीकाठच्या इमारतींवर घरटी करतात. याचं कारण साप, मुंगुस, भटकी कुत्री आणि माणसांपासून आमच्या अंड्यांचं संरक्षण होतं.

आमची पिल्लं इतकी शूर आहेत की, ती अंडी फोडून बाहेर आली की काही तासांतच ती गच्च्यांमधून सरळ खाली उड्या ठोकतात. ही उडू न शकणारी, मऊ परांमधली पिल्लं वेगवान थरथर करत जमिनीवर पडतात. अशावेळी जमिनीवर उभे असलेले त्या पिल्लांचे पालक त्यांना सतत आवाज करून मार्गदर्शन करतात आणि ताब्यात घेतात. नंतर सुरक्षित ठिकाणी हलवतात. अशाप्रकारच्या खतरनाक उड्यांमधे धडधाकट आणि निरोगी पिल्लंच जगतात. निसर्ग त्यांनाच पुढे घेऊन जातो.

आता तरी मला ओळखलंत का?

'टवीटि' या शब्दातील शेवटचं अक्षर प्रथम ठेवलं की.. तेच माझं नाव.

**-राजीव तांबे**
*rajcopper@gmail.com*
*(प्रसिद्ध बालसाहित्यिक)*

विनोद

▶ रद्दीवाला- हे खूप वाईट झाले. मी ऑलिम्पिक्सच्या तिथे असतो तर नक्कीच काहीतरी केले असते.
काकू- हो ना. तुमचा काटा तिथे असता तर २ किलो कमीच निघाले असते वजन.

▶ दोन वाघ झाडाखाली आरामात बसले होते. समोरून एक ससा जोरात पळून गेला.
पहिला वाघ- आता इथून काय गेलं रे?
दुसरा वाघ- काही नाही रे, फास्ट फूड होतं.

**आकाशात** चित्रविचित्र आकार धारण करणारे ढग आपण फक्त एक 'थोडीशी गंमत' म्हणून बघतो आणि विसरून जातो. पण या ढगांचा अभ्यास सौंदर्यशास्त्राच्या दृष्टिकोनातूनही केला जातो. या 'ढगसौंदर्याभ्यासाला' म्हणतात नेफॉलॉजी (Nephology). 'नेफोस' (Nephos) या शब्दाचा ग्रीक भाषेत अर्थ आहे ढग. त्या ढगांचा अभ्यास म्हणजे नेफॉलॉजी आणि ढगांचा अभ्यास करणारे 'नेफॉलॉजिस्ट' (Nephologist).

पाऊस कधी पडणार, किती, केव्हा या हवामानशास्त्रातील प्रश्नांचा या 'नेफॉलॉजी' किंवा मराठीत 'ढगॉलॉजी'शी काहीही संबंध नाही. ढगांचे सौंदर्य न्याहाळणे, आकारमानाप्रमाणे आणि आकाशातील त्यांच्या जागेनुसार ढगांचे प्रकार पाडणे, त्यांना योग्य ती नावे देणे आणि मुख्य म्हणजे या साऱ्याचा

# ढगॉलॉजी

सध्या ढगांचं निरीक्षण केलं तर वेगवगळे आकार, रंग आकाशात दिसतात. ऑगस्ट २०१३च्या अंकामध्ये प्रसिद्ध झालेला हा लेख खास पुन्हा प्रसिद्ध करत आहोत. ढगांचे निरीक्षण करणे, फोटो काढणे, त्यांना समर्पक नाव देणे हा एक छंद आहे. हा छंद जपणारे जगभरातील लोक एकमेकांच्या संपर्कात राहण्यासाठी 'The Cloud Appreciation Society चे सदस्य होतात.

मनसोक्त आस्वाद घेणे म्हणजे 'नेफॉलॉजी' ऊर्फ आपली 'ढगॉलॉजी'!

ढगांवर प्रेम करणारा कुणीही 'नेफॉलॉजिस्ट' होऊ शकतो. त्याला कुठल्याही विद्यापीठ, महाविद्यालयाच्या पदवी अथवा पदविकेची आवश्यकता नाही. ढगांवर तर अभ्यासपूर्वक प्रेम





करणे ही अट असते. ढगांचे फोटो काढून ते इंटरनेट, मोबाइल, मासिक –वृतपत्रांद्वारे इतर ढगप्रेमींशी वाटून घेणे हा नियम, एवढीच ह्या शास्त्राची माफक अपेक्षा आहे.

या शास्त्राची सुरुवात झाली १८०३ साली! म्हणजे आपली 'ढगॉलॉजी' तब्बल २१० वर्षे जुनी आहे. इंग्लंडचे ल्युक हावर्ड (Luke Howard–जन्मवर्ष १७७३ ते मृत्यू १८६४) यांनी प्रथम



*पिसासारखा ढग*



*मॅरेथॉन मॅन!*

ढगांची अभ्यासपूर्वक वर्गवारी केली आणि पहिला लेख १८०३ साली लिहिला. तेव्हा प्रसारमाध्यमेच काय तर वृत्तपत्रेही नव्हती! ल्युक हावर्ड जमेल तिथे मुलं, तरुण जमवीत आणि ढगांबद्दल माहिती देत. 'नेफॉलॉजीचा' हा प्रसार मौखिक ज्ञानप्रसारातूनच झाला, असे म्हणावयास हवे .

समुद्रसपाटीपासून ते ६०००फूट उंचीपर्यंत आकाशात जे ढग दिसतात, त्याचे तीन प्रकार पडतात.

1) Stratus
2) Cumulus
3) Stratocumulus

Stratus म्हणजे चटई, सतरंजी अथवा पायघड्या घातल्याप्रमाणे पसरलेले दिसतात ते ढग.

कॉलिफ्लॉवरच्या फुगीर,भरीव फुलासारखे दिसणारे ढग म्हणजे Cumulus. हे Cumulus ढग पसरून चटई तयार झाली की, त्याला Stratocumulus म्हणतात. प्रकारचे ६,०००फूट ते १८,००० फुटांवरील ढग दिसतील, ते Altostratus आणि Altocumulus. १८,०००फुटांवरील कुरळ्या केसांसारखे दिसणारे ढग म्हणजे Cirrocumulus आणि त्याहूनही उंचावर म्हणजे ५०,००० फूट किंवा अधिक उंचीवर दिसणाऱ्या ढगांना म्हणतात- Cumulonibus. ही झाली ढग-अभ्यासाची प्राथमिक माहिती. पुढे वाढवू तेवढा अभ्यास कमीच आहे. पण यात कठीण काहीच नाही. जगभरातील सजग ढगप्रेमींनी एकत्र येऊन एक संस्था स्थापन केली आहे, ज्यायोगे अपरिचित देशातील कोणत्याही अनोळखी व्यक्तीशी आपण ढगांबाबत माहितीची देवाणघेवाण करू शकतो. ही संस्था सभासदांसाठी दर महिन्याला एक मासिक (आता online ही)निघते. जगभरातील ढगप्रेमी नुकत्याच पाहिलेल्या छानदार ढगांचे फोटो इथे पाठवतात. त्यांतील सर्वोत्कृष्ट ढगास 'Cloud of the month' चा सन्मान मिळतो. वर एक ढगाचा फोटो दिला आहे तो बक्षिसपात्र ढग पाहा, कसा शर्यतीत धावणाऱ्या स्पर्धकासारखा दिसतो आहे! त्याचे नाव ठेवले आहे- Marathon man- मॅरेथॉन मॅन!

या संस्थेची वेबसाइट पाहिलीत तर इथे फक्त ढगांचे फोटोच नाही, तर ढगांबद्दलची कोडी, गेम्स, विनोदही सापडतील. उत्साही आणि उद्योगी मुलांसाठी घरच्या घरी ढग बनवण्याची कृतीदेखील व्हिडिओसकट मिळेल. आहे की नाही गंमत? Clouds App ही मोबाइलवर फुकट उतरवून घेता येईल! एवढेच नाही तर, वेळ आणि खर्च करण्याची तयारी असेल तर 'ढग-दर्शन' पिकनिक्ससुद्धा असतात- त्याही जगभरातील निरनिराळ्या देशांत!

मुसळधार पावसाचा जोर कमी होऊन ऊन-पावसाची गंमत सुरू असेल. या महिन्यात ढग बघण्याची मजा काही अवर्णनीय असते बरं!

बघा, तुम्हांलाही एखादा अवलिया ढग दिसतो का? आणि दिसलाच तर फोटो काढून 'वयम्'ला पाठवा. त्याला छानसं नावही द्या!

**-कृपा कुलकर्णी**
*krupa.kulkarni@yahoo.com*

**असे आकर्षक ढग पाहण्यासाठी**
**The Cloud Appriciation Society**
**या वेबसाइटला भेट द्या.**